
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर सोमवार, दि. ०१ सप्टेंबर २०२५ वर्ष - तिसरे अंक १५० पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### शेतरस्त्याच्या वादातून शेतकऱ्याचा खून; दोन महिला जखमी

कळगाव शिवारातील घटना : दोन आरोपी अटकेत

**परभणी,दि.३१(प्रतिनिधी) :** कळगाव शिवारातील शेतातून जाण्या-येण्यासाठी रस्ता न दिल्याचा राग मनात धरून दोघा जणांनी शेतातील आखाड्यावर झोपलेल्या शेतकऱ्यावर चाकूने वार करत त्यांचा निर्घृण खून केला. या घटनेत दोन महिला गंभीर जखमी झाल्या.

कळगाव शिवारातील गट क्रमांक १६९ या शेतातून रस्ता दिला नाही म्हणून कुबेर दादाराव माने (रा.कळगाव) व कैलास उर्फ बाळू साहेबराव होनमणे (रा. ताडकळस) यांनी मनात राग धरुन शुक्रवार २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७.३० वाजेच्या सुमारास शेतातील आखाड्यावर जाऊन विलास उत्तम शिंदे (वय ५०) यांच्या पोटात चाकूने वार केले. यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर आखाड्यावर असलेल्या शिंदुबाई विलास शिंदे व जयश्री चंद्रकांत शिंदे या दोघींना गंभीर जखमी केले.

घटनेची माहिती मिळताच सपोनि गजानन मोरे, पोलिस उपनिरीक्षक गजानन काठेवाडे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. लगेचच दोन्ही आरोपींना अटक केली. या घटनेत जखमी झालेल्या जयश्री शिंदे यांना परभणी येथील रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, याप्रकरणी चंद्रकांत विलास शिंदे यांनी ताडकळस पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

### लोकमान्य नगरातील ज्येष्ठ नागरिक भंवरलालजी बोथरा यांचे निधन

**परभणी,दि.३१(प्रतिनिधी) :** लोकमान्य नगरातील ज्येष्ठ नागरिक भंवरलालजी बोथरा यांचे शुक्रवारी (दि.२९) दुपारी ३ वाजता निधन झाले. मृत्यूसमयी ते ९७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. दरम्यान, त्यांच्या पार्थीवावर सायंकाळी ५ वाजता वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. कृषि विद्यापीठातील प्रा. विजयकुमार बोथरा यांचे ते वडिल होत.

### समृद्धी महामार्ग बाधित शेतकऱ्यांनी घेतली बच्चुभाऊ कडू यांची भेट;

शेतकऱ्यांच्या आंदोलनाकडे प्रशासनाद्वारे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप

**परभणी,दि.३१(प्रतिनिधी) :** नांदेड-जालना समृद्धी महामार्ग बाधित शेतकऱ्यांच्या एका शिष्टमंडळाने आज शनिवार ३० ऑगस्ट रोजी अमरावती येथे माजी राज्यमंत्री व प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चुभाऊ कडू यांची भेट घेऊन आपल्या मागण्या मांडल्या.

नांदेड-जालना समृद्धी महामार्गामुळे परभणी जिल्ह्यातील सेलू व जिंतूर तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप करत बाधित शेतकरी मागील अनेक दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. आज या शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने बच्चुभाऊ कडू यांची भेट घेतली. आपल्या व्यथा मांडल्या. सेलू तालुक्यातील मौजे जवळा जिवाजी, चिकलठाणा खुर्द, चिकलठाणा बुद्रुक, रायपूर, वालूर, हातनुर, गुळखंड, तांदुळवाडी, हट्टा व जिंतूर तालुक्यातील मारवाडी या गावांतील शेतकऱ्यांच्या जमिनींचे संपादन अत्यल्प दरात होत असून, शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळत नाही अशी तक्रार करण्यात आली आहे. या अन्यायाविरोधात शेतकरी सेलू उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसले असतानाही प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आणून दिले.

यावेळी झालेल्या चर्चेनंतर बच्चुभाऊ कडू यांनी परभणी जिल्हाधिकारी यांच्याशी दूरध्वनीवरून थेट संपर्क साधून, बाधित शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे, औरंगाबाद खंडपीठात या विषयावर दाखल याचिकेचा निर्णय होईपर्यंत भूसंपादनाची कोणतीही पुढील प्रक्रिया राबवू नये, अशा स्पष्ट सूचना दिल्या. दरम्यान, या शिष्टमंडळामध्ये प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाप्रमुख शिवलिंग बोधने, प्रशांत नाईक, रमेश माने, निशांत मुंढे, विजय खरात, राजेश मोहिते आदी शेतकरी सहभागी झाले होते.

### क्रिडा दिनानिमित्त विविध क्रीडा स्पर्धा; खेळाडूंचा उत्स्फुर्त सहभाग :

परभणी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाद्वारे आयोजन

**परभणी,दि.३१(प्रतिनिधी) :** युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार तसेच क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, परभणी यांच्या वतीने २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. हॉकीचे जादूगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त विविध क्रीडा उपक्रम राबविण्यात आले. या निमित्ताने योगासन, टेबल टेनिस, सर्कल कबड्डी, बास्केटबॉल, स्केटिंग, रोप स्किपिंग आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमास जिल्हा क्रीडा अधिकारी गीता साखरे, जिल्हा क्रीडा संकुल समिती सदस्य गणेश माळवे, राज्य क्रीडा मार्गदर्शक संजय मुंढे, तालुका क्रीडा अधिकारी कल्याण पोळे, क्रीडा अधिकारी सुयश नाटकर, रोहन औढेकर, कार्यालय अधीक्षक रमेश खुणे, तसेच दुधारे पंडित, धीरज नाईकवाडे आणि क्रीडा शिक्षक उपस्थित होते.

मेजर ध्यानचंद यांच्या कार्याची माहिती तसेच शासकीय क्रीडा योजनांबाबत जिल्हा क्रीडा अधिकारी गीता साखरे आणि गणेश माळवे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी हर गल्ली हर मैदान, खेले सारा हिंदुस्तान या संकल्पनेवर आधारित उपक्रमाचे महत्त्व स्पष्ट करत खेळाडूंनी दररोज एक तास मैदानावर खेळायला यावे, असे आवाहन राज्य क्रीडा मार्गदर्शक संजय मुंढे यांनी केले. या कार्यक्रमात खेळाडूंना क्रीडा शपथ क्रीडा अधिकारी सुयश नाटकर यांनी दिली.

### जिल्हाभरात झाले गौरींचे आगमन

**परभणी,दि.३१(प्रतिनिधी) :** जिल्हाभरात सध्या गणपती उत्सव मोठया प्रमाणात सुरु आहे. त्यातच गौरींचे देखील दि.३१ ऑगस्ट रोजी सांयकाळी मोठया उल्हासात घराघरात आगन झाले आहे. यावेळी घरासमोर आकर्षक अशी रांगोळी काढून गौरीचे आगमन झाले. यावेळी महिलांनी गौरीची मनोभावे पुजा-अर्चना सुरु केली आहे. अशावेळी महिलांनी घरात सुंदर असे देखावे देखील सादर केली असून आज गौरीचे मोठया प्रमाणात पुजा-अर्चना करण्यात येत आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्ह्यात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.
**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५. ९२८४६६४४३०. ९२८४६९५५८३

# खोरस येथिल खंडागळे यांचे प्रेत ४१ तासानंतर मिळाले

## शोध पथकास यश, लेंडी नदीत गेला होता वाहून



**मोहन धारासूरकर**
**परभणी /प्रतिनिधी-** तालुक्यातील खोरस येथील परमेश्वर साहेबराव खंडागळे वय २५ वर्षे हा युवक दिनांक २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजता लेंडी नदीत पाय घसरून पाण्यात वाहून गेला होता गावकरी व पोलिसांनी तात्काळ शोधमोहीम सुरू होती दि. ३१ ऑगस्ट रोजी दुपारी ११ वाजण्याच्या दरम्यान खोरस ते पिपळगाव नदित च्या



पाण्यात परमेश्वर खंडागळे चे प्रेत सापडले.

या वेळी गंगाखेड व पुर्णे ची आठ जणांची टीम बोटीद्वारे शोधमोहीम हात्ती घेतली होती. या वेळी गंगाखेड चे उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर हे स्वतः घटना स्थळी हजर राहून शोधकार्यवर नियंत्रण ठेऊन होते. तर पालम चे तहसीलदार उषाकिरण शृंगारे, पालम पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शेषराव खटाणे, व तहसीलचे कर्मचारी, पोलिस कर्मचारी, शोध मोहीमेत अग्निशमन दल गंगाखेड व पूर्णा तसेच शोध कार्य टीमचे राम विलास खडेलवाल,श्याम जगतकर,श्रीकांत साळवे, अभिषेक साळवे, सुरज खंडेलवाल,आकाश लव्हाळे, सिताराम भेंडेकर, राज पैठणी, सोनाजी खिल्लारे राजेश चावडीया व तहसिलचे मंडळ अधिकारी आलेवार, तलाठी शुभांगी आळे, शिवप्रसाद वाव्हळे,माधव कांबळे व गावातील युवकानी परीश्रम घेतले.

## सोनपेठ येथे घेण्यात आले आरोग्य शिबीर



**सोनपेठ,/प्रतिनिधी-** येथील ग्रामीण रुग्णालय यांच्या वतीने दि ३१ ऑगस्ट रोजी सोनपेठ शहरातील छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक सभागृह येथे राज्य व केंद्र शासनाच्या आरोग्य विषयक विविध योजनांचे ओळखपत्र काढून देणे, तसेच विविध आजारांची तपासणी,निदान उपचार, शिबिराचे निशुल्क आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे कार्ड या माध्यमातून सर्वसामान्यांना आरोग्य विषयक सर्व सुविधा मोफत मिळाव्यात हा हेतू होता या शिबिरात आ भा ५३,आयुष्यमान भारत४३, रक्त तपासणी शुगर बीपी तपासणी ४० लाभार्थीने लाभ घेतला हे शिबिर यशस्वीतेसाठी समाजसेवक बळीभाऊ काटे, आरोग्य कल्याण समिती सदस्य न पं अधिकारी अजय पांडे,डॉ विठ्ठल कराड वैद्यकीय समन्वयक अधिकारी, स्वप्निल राठोड वैद्यकीय कॅम्प समन्वयक अधिकारी, श्याम मस्के आरोग्य मित्र ,डॉ हालगे, डॉ भारत चव्हाण, डॉ बिभीषण जाधव, डॉ मन्मथ महाजन, बालाजी राठोड,हनुमंत घुगे, श्रीमती वैष्णवी गाडे,सारिका चाटे, नफिया बेगम,गोविंद राठोड,अजय राठोड, सौरभ चव्हाण, सुधाकर कुकरे, सुंदर वाघमारे, राजेभाऊ दातार इत्यादी अधिकारी व कर्मचाऱ्यांसह हे शिबिर संपन्न झाले.

## मेंदूस दुखापत झालेल्या युवकाचे प्राण वाचविण्यात आर.पी. हॉस्पिटलच्या डॉक्टरांना यश : युवकास मिळाले जीवनदान

**परभणी,/प्रतिनिधी-** मेंदूस दुखापत झालेल्या युवकाचे प्राण वाचविण्यात आर.पी. हॉस्पिटलच्या डॉक्टरांना यश : युवकास मिळाले जीवनदान



परभणी,दि.२८(प्रतिनिधी) : मेंदूला गंभीर दुखापत झालेल्या २० वर्षीय तरुणाचे प्राण वाचविण्यात आर.पी. हॉस्पिटलच्या डॉक्टरांना यश आले असून त्यामुळे त्या युवकास जीवनदान मिळाले आहे.

या तरुणाला मेंदूची दुखापत, मायोकार्डायटिस (हृदयाच्या स्नायूंची जळजळ), डाव्या फुफ्फुसाचा निमोनिया आणि संपूर्ण शरीरात पसरलेला जंतुसंसर्ग यामुळे गंभीर अवस्था निर्माण झाली होती. यासोबतच रक्तदाब कमी होणे आणि ऑक्सिजन पातळी घसरणे यासारख्या गंभीर समस्या उद्भवल्या होत्या. रात्री उशिरा रुणाला हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्याची प्रकृती अत्यंत नाजूक असल्याने तात्काळ व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले आणि तब्बल १० दिवस व्हेंटिलेटर सपोर्टवर उपचार सुरू होते. हॉस्पिटलच्या अत्याधुनिक आय.सी.यू सुविधा आणि मेडिसिन विभागातील तज्ञ डॉक्टरांच्या टीमने तत्परतेने उपचार सुरू केले. आर.पी. हॉस्पिटलच्या अत्याधुनिक वैद्यकीय यंत्रणेने आणि समन्वित उपचार पद्धतीने या गंभीर रुग्णासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, ज्यामुळे रुग्णाला त्वरित आणि प्रभावी उपचार मिळणे शक्य झाले.

मेडिसिन विभागातील तज्ञ डॉ. संतोष हरकळ म्हणाले, रुग्णाची प्रकृती अत्यंत नाजूक होती. मेंदूची दुखापत, मायोकार्डायटिस, डाव्या फुफ्फुसाचा निमोनिया आणि जंतुसंसर्ग यामुळे हृदय आणि श्वसन यंत्रणेवर गंभीर परिणाम झाला होता. रक्तदाब कमी होणे आणि ऑक्सिजन पातळी घसरणे यामुळे तात्काळ उपचार आवश्यक होते. आम्ही रक्त तपासण्या, अँटिबायोटिक्स, १० दिवसांचा व्हेंटिलेटर सपोर्ट आणि हृदयाला आधार देणारी औषधे यांचा समन्वय साधून उपचार केले. हॉस्पिटलच्या अत्याधुनिक यंत्रणेमुळे आणि आमच्या टीमच्या सामूहिक प्रयत्नांमुळे रुग्णाला स्थिर करणे शक्य झाले, असे डॉ.हारकळ यांनी सांगितले.

## शिवानी थिटे जीवशास्त्र विषयात परीक्षा उत्तीर्ण

जीवशास्त्र या विषयात मिळतिले घवघवीत यश

**जिंतूर,/प्रतिनिधी-** वरुड (नृ.) येथील शिवानी राजेंद्र थिटे हिने (जीवशास्त्र) विषयात राज्यस्तरीय पात्रता परीक्षा () यशस्वीरीत्या उत्तीर्ण होऊन आपले नाव उज्ज्वल केले आहे. तिच्या या यशामुळे कुटुंबीय, मित्रपरिवार व शिक्षकवर्गामध्ये आनंदाचे वातावरण आहे.

शिवानीने कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले. सारखी कठीण परीक्षा पार करताना तिने दाखवलेली जिद्द आणि अभ्यासू वृत्ती कौतुकास्पद आहे. तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

भविष्यात आणखी मोठ्या यशाच्या शुभेच्छा माजी मंत्री ज्ञानोपासक मंडळाचे अध्यक्ष माजी खा. गणेशराव दुधगावकर, सचिव डॉ.संध्याताई दुधगावकर, मा.आमदार रामप्रसादजी बोर्डीकर, सौ.मीनाताई बोर्डीकर, राज्यमंत्री मेघनादीदी साकोरे - बोर्डीकर, मराठवाडा सर्वोदय शिक्षण मंडळ अध्यक्षा श्रीमती आशाताई आकात, सचिव कपिल आकात , प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे,. प्राचार्य डॉ. भारत खंदारे, उपप्राचार्य प्रा.पांडुरंग निळे, डॉ. दिनकर कोतवाल, डॉ. पंडित चोपडे, डॉ.अशोक वैद्य, डॉ.माणिक खंदारे , डॉ.पंढरीनाथ धोंडगे, जिंतूर मार्केट कमिटीचे सभापती गंगाधररावजी कदम बोर्डीकर, प्रमोदराव चव्हाण, बाबासाहेब नवल, प्रा सतीश मगर आदींनी दिल्या आहेत.



### आणखी कठोर मेहनत घेणार- शिवानी थिटे

**दरम्यान या मिळलेल्या घवघवीत यशानंतर आता मी पुन्हा एकदा नव्याने आपली सुरुवात करणार असून या यशामुळे मला आणखीन जीवनात पुढे पडण्यास प्रेरणा मिळणार आहे. त्यातच माझ्या पेक्षाही जास्त माझ्या यशामागे आई-वडिलांचा सहभाग आहे. त्यामुळे या यशानंतर मी आणखीन जोमाने परत मेहनत घेणार असेही ती यावेळी म्हणाली.**

## भर पावसात जिंतूरात ९२५ जणांनी केले रक्तदान

**जिंतूर,/प्रतिनिधी-** इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मोहंमद पैगंम्बर यांच्या जयंती निमित्त शुक्रवार दि २९ ऑगस्ट रोजी जमियत उलमा ए हिंद च्या वतीने जामा मस्जिद प्रागणात असलेल्या मदरसा जामिया इस्लामिया दारुल उलूम मेहमूदिया मध्ये मौलाना तजमुल अहमद खान यांनी भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले होते. संततधार पावसात संपन्न झालेल्या या शिबिरात ९२५ तरुणांनी रक्तदान केले तालुक्यात सर्वत्र गुरुवार दि २८ ऑगस्ट पासून संततधार पाऊस पडत होता शुक्रवारी दुपारी एक वाजेपर्यंत जोरदार पाऊस पडत हित या पडत्या पावसात ही शहरातील मुस्लिम तरुणांनी रक्तदान करण्यासाठी रांगा लावल्या होत्या दुपार पर्यत चारशे तरुणांनी रक्तदान केले शुक्रवारच्या नमाज नंतर मात्र रक्तदान करण्यासाठी महिला,तरुणांनी रक्तदान करण्यासाठी रांगा लावल्या होत्या संध्याकाळ पर्यंत ९२५ रक्तदात्यांनी रक्तदान केले रक्त संकलित करण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयाचे रक्तपेढीतील कर्मचारी,अधिकारी,हिंगोली जिल्हा सामान्य रुग्णालयातील कर्मचारी,नंदुरबार जिल्हा रुग्णालयातील कर्मचायनी परिश्रम घेतले.हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी शहरातील मुस्लिम समाजाच्या सर्व तरुणांनी परिश्रम घेतले मान्यवरांच्या भेटी या रक्तदान शिबिराला माजी नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख, लक्ष्मणराव बुधवंत,प्रदीप चव्हाण,नानासाहेब राऊत, परभणी रक्तपेढीच्या राठोड,जिंतूर ग्रामीण रुग्णालयाचे वैधकीय अधीक्षक डॉ रविकिरण चांडगे,मौलाना जलील,मुफ्ती मिर्झा कलीम बेग,परभणी चे सय्यद अ. कादर व त्यांचे सहकारी,शहरातील माजी नगरसेवक,पोलीस अधिकारी व क्रंचारयानी भेटी दिल्या चौकट महिलांनीही केले रक्तदान सकाळपासूनच पावसाची रिपरिप सुरू होती या पावसात असंख्य महिलांनी मदरसा प्रांगणात येऊन रक्तदान केले.



# जिंतूर हे शहर डीजेमुक्त करणार- वाघमारे

**रामप्रसाद कंठाळे**
**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर मध्ये डीजे मुक्त करणार उपविभागीय पोलीस अधिकारी श्री वाघमारे साहेब जिंतूर जिंतूर येथे शांतता समितीची बैठक लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे मंगळवारी दुपारी तीन वाजता संपन्न झाली.



या बैठकीत आपले मनोगत व्यक्त करताना उपविभागीय पोलीस अधिकारी श्री वाघमारे साहेब यांनी सर्व गणेश मंडळाच्या अध्यक्षांना सूचना देण्यात आल्या की गणेशोत्सव विविध मोठ्या थाटामाटाने साजरा करा व या सणाला कुठल्याही प्रकारचे गालबोट लागू नये व कायदा सुव्यवस्था हातात कुणीही घ्यायचा प्रयत्न करू नये तसेच गणपती समोर डीजे वाजण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे तसेच गतवर्षी जिंतूर मध्ये गणेश विसर्जन च्या मिरवणुकीमध्ये डीजे च्या आवाजामुळे एक तरुण मित्राचा मृत्यू झाला त्यामुळे जिंतूर शहरांमध्ये डीजे बाजूने डिजे वरबंदी करण्यात येत आहे तुम्ही डीजे वर खर्च करण्यापेक्षा इतर सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम घ्या त्यामध्ये खर्च करा परंतु डीजे वर अजिबात खर्च करू नका डीजे मुळे तुम्हाला व तुमच्या कुटुंबांना व इतरांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची आपण दक्षता घ्या या कार्यक्रमास शांतता बैठकीमध्ये नगरपरिषदेचे मुख्य अधिकारी श्री दंडवते साहेब यांनी जिंतूर शहरांमध्ये गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येतील असे त्यांनी शांतता बैठकीत जाहीर केले यावेळी जिंतूरचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांनी सुद्धा शहरांमध्ये ईद व गणेश उत्सव मोठ्या उत्साहाने शांततेत पार पाडावे अशा सूचनाही त्यांनी केल्या त्या बैठकीचे सूत्रसंचालन श्री मेहेत्रे साहेब यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री पत्रकार प्रदीप कोकडवार यांनी मांनले या कार्यक्रमास पोलीस अधीक्षक रवींद्र सिंह परदेशी उपविभागी पोलीस अधिकारी श्री वाघमारे साहेब जिंतूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री गजेंद्र सरोदे नायब तहसीलदार गायकवाड साहेब नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दंडवते जिंतूरचे प्रतिष्ठित व्यापारी ब्रिज गोपाल तोष्णीवाल व्यापारी महासंघाचे अध्यक्ष रमेश दरगड बालाजी सांगळे, बालाजी शिंदे मौलाना जलील यांच्यासह सर्व खात्याचे खाते प्रमुख व व्यापारी पत्रकार नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर सोमवार, दि. ०१ सप्टेंबर २०२५ वर्ष - तिसरे अंक १५० पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सरकारला प्रश्न सोडवायचा आहे, मात्र... : विखे पाटील



मुंबई: जरांगे पाटील यांच्या उपोषणावर मार्ग काढण्यासाठी तसेच त्यांनी दिलेल्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी उपसमितीची बैठक मंत्री विखे पाटील यांच्या निवासस्थानी संपन्न झाली. या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना विखे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या प्रश्नाबाबत जरांगे पाटील यांच्याकडून आलेल्या प्रस्तावावर उपसमितीने चर्चा केली असून, यासंदर्भात कायदेशीर मार्गदर्शन घेत असल्याचे सांगितले. तसेच सरकारला प्रश्न सोडवायचा आहे,मात्र महाविकास आघाडीचे नेते केवळ राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी वेगवेगळी विधान करीत आहे. घटनेत बदल करून आरक्षणाचा प्रश्न निकाली काढण्याचा सल्ला देणारे शरद पवार केंद्रात मंत्री असताना गप्प का बसले असा सवाल जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केला.

या बैठकीला मंत्री गिरीष महाजन मंत्री दादा भुसे,मंत्री मकरंद पाटील मंत्री शिवेंद्रराजे भोसले,तसेच अन्य मंत्री दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. तसेच विधी व न्याय विभागाचे वरिष्ठ अधिकारी देखील बैठकीला उपस्थित होते.

बैठकीनंतर काय ठरले?

बैठकीनंतर माध्यमांशी बोलतांना मंत्री विखे पाटील म्हणाले की, प्रश्न सोडविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात उपसमिती काम करीत असून,काल त्यांनी दिलेल्या प्रस्तावावर आजच्या बैठकीत चर्चा सकारात्मक झाली असल्याचे त्यांनी सांगितले. हैद्राबाद आणि सातारा गॅजेटिअर बाबत विस्ताराने आजच्या बैठकीत चर्चा झाली. यातील त्रृटी विचारात घेवून अंमलबजावणी करताना कायदेशीर अडचणी येऊ नयेत म्हणून राज्याचे ॲडव्होकेट जनरल यांच्याशी चर्चा करणार असल्याचे विखे पाटील म्हणाले. काल बीड जिल्ह्यातील आमदारांनी भेट घेऊन केलेल्या मागण्याबाबत विचार करू,समितीकडे अशा अनेक सूचना येत असतात त्याचे स्वागत करून समितीचे सदस्य विचारही करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

विरोधकांवर विखे पाटीलांचा हल्लाबोल

जरांगे पाटील यांना कोणी भेटायला जावे यावर आक्षेप असण्याचे काहीही कारण नाही. मात्र जे फक्त या विषयाचे राजकारण करून पोळी भाजण्यासाठी येत आहेत त्यांना जरांगे पाटलांनी कधीतरी प्रश्न विचारून आरक्षणाच्या संदर्भातील भूमिका स्पष्ट करण्याची मागणी केली पाहीजे. असे म्हणत त्यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला आहे.

माजी मंत्री शरद पवार यांनी घटनेत बदल करून आरक्षणाचा प्रश्न सोडविण्याबाबत केलेल्या वक्तव्याचा समाचार घेताना मंत्री विखे पाटील म्हणाले की,राज्यात चारवेळा मुख्यमंत्री राहीलेल्या शरद पवार यांना मंडल आयोग स्थापन करण्यापुर्वी हे लक्षात का आले नाही.त्याचवेळी मराठा समाजाचा समावेश त्यामध्ये करण्याचे का सुचले नाही.मराठा आरक्षणाचा प्रश्न आज निर्माण झालेला नाही.दहा वर्ष केंद्रात मंत्री राहीले तेव्हा जबाबदारी पूर्ण केली नसल्याचा थेट आरोप मंत्री विखे पाटील यांनी केला. ओबीसी मधून मराठा समाजाला आरक्षण देता येते किंवा देवू नये यावर कधी तरी त्यांनी भाष्य केले पाहीजे उगाच ज्ञानदानाचे काम करू नये.

## विराज आय ॲण्ड डेंटल हॉस्पिटलमध्ये कॅन्सरमुक्त रुग्णांसोबत गणेश आरतीचे आयोजन



बिडकीन दि ३१ ऑगस्ट - छत्रपती संभाजीनगर येथे दि ३१ ऑगस्ट रोजी दुपारी १२:३० वाजता विराज आय ॲण्ड डेंटल हॉस्पिटल, येथे एक आगळीवेगळी आणि भावनिक गणेश आरती पार पडली. या आरतीचे विशेष आयोजन डॉ. विक्रांत जैस्वाल (बी डी एस,एम डी एस) ऑर्थोडॉन्टिस्ट, फेलो इन इम्प्लांटोलॉजी) आणि डॉ. राजेश्वरी परदेशी (घएचक मुंबई, डि एम एच पुणे, फेलो इन स्किंट, अर्विंद हॉस्पिटल, मदुराई, तामिळनाडू) यांच्या हस्ते करण्यात आले.या वेळी उपस्थित होते असे रुग्ण जे कॅन्सरमधून पूर्णपणे बरे झाले आहेत किंवा ज्यांना पूर्वकॅन्सर अवस्थेमधून बाहेर काढण्यात आले आहे. प्रत्येक रुग्णाने आपल्या जीवनातील अनुभव शेअर केले. रुग्णांनी सांगितले की, व्यसनमुक्त होऊन त्यांना नवीन आयुष्य मिळाल्यासारखे वाटते. या कार्यक्रमामागील प्रमुख उद्देश होता की, या रुग्णांना मानसिक, सामाजिक आणि आत्मिक आधार देणे. गणपती बाप्पाच्या आशीर्वादाने त्यांचे मनोबल वाढावे आणि त्यांनी ज्या कठीण परिस्थितींतून प्रवास केला आहे, त्यात त्यांना आत्मविश्वास मिळावा, हा हेतू होता.विराज आय ॲण्ड डेंटल हॉस्पिटल यांच्याकडून अशीच उपक्रमशील, प्रेरणादायी आणि सामाजिक भान जपणारी कार्ये भविष्यातही राबवण्यात येणार आहेत असे शेवटी डॉ. विक्रांत जैस्वल यांनी सांगितले.

## श्री मोहटादेवी विद्यालयात मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन



बिडकीन दि ३१ ऑगस्ट - पैठण तालुक्यातील श्री मोहटादेवी विद्यालय म्हारोळा येथे आज दिनांक २८ ऑगस्ट रोजी विविथ क्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ध्यानचंद मेजर यांच्या विषयी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी यात भाग नोंदविला. हॉकीचे महान जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे प्राचार्य आदरणीय घोरतळे यांच्या हस्ते करण्यात आले. सुभाष गवई यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दीपक कर्डिले , ज्योती गायकवाड, पठाण , सतीश मुख्येकर, शंकर भैय्या, बद्रीनाथ धरपळे, अनिता डोंगरे, रमेश ऋषी, यांनी आता परिश्रम घेतले

सदर कार्यक्रमासाठी भैरवनाथ शिक्षण संस्था अहमदनगर संचलित संस्थापक अध्यक्ष डॉक्टर धनंजय मुखेकर, संस्थापकीय सचिव वंदना मुख्येकर , यांनी सदर कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. ज्योती गायकवाड यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी मेजर ध्यानचंद यांच्या विचारावर प्रकाश टाकला. २८ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट पर्यंत विद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात प्रामुख्याने कबड्डी, अथलेटिक्स, वाद विवाद स्पर्धा, त्या मनोरंजनात्मक स्पर्धा, सायकल रॅली इत्यादी स्पर्धांचा समावेश आहे.

## भगवती विद्यालयमध्ये राष्ट्रीय खेळ दिवस साजरा



बिडकीन दि ३१ ऑगस्ट -पैठण तालुक्यातील भगवती विद्यालय बिडकीन येथे राष्ट्रीय खेळ दिवस उत्साहात साजरा करण्यात आला प्रथम प्रशालेचे मुख्याध्यापक रायभान रकटे यांनी मेजर ध्यानचंदजी यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यकर्माची सुरवात केली. निमित्ताने विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा, कवायत, मैदानी खेळ अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राध्यापक रविंद्र तवार , व प्रशांत शिंदे यांनी हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंदजी यांच्या जयंती निमित्त जीवन कार्यावर प्रकाश टाकला कार्यक्रमाची प्रस्तश्रवना कमलाकर काळे यांनी तर आभार श्रीम विश्रांती सलगरे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीधर जऱ्हाड, सुनील पवार, रामनाथ धनवे ,आप्पासाहेब किसवे, सुभाष राठोड, आशुतोष झारगड यांचे सहकार्य केले, पसायदानणे कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## मराठा आरक्षणसाठी युवकाची आत्महत्या

मुंबई : मराठा आरक्षणासाठी मुंबईतील आझाद मैदानात मनोज जरांगेंनी बेमुदत उपोषण सुरू केले आहे. तर त्यांच्यासोबत मराठा समाजाचे शेकडो बांधव मैदानावर हजर आहेत. शिवाय राज्यभरातूनही अनेकजण मुंबईत दाखल होत आहेत. या दरम्यान अंबाजोगाई तालुक्यातील सुगाव येथे शनिवारी एक धक्कादायक घटना घडली आहे. या ठिकाणी एका तरुणाने मराठा आरक्षणाच्या मागणी करत थेट गळफास लावून आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. मनोज जरांगे यांनी आझाद मैदानावर सुरू केलेल्या बेमुदत उपोषणानंतरही, मराठा आरक्षणाबाबत कुठलाही तोडगा निघाला नसल्याने आलेल्या नैराश्यातून नितीन माणिकराव चव्हाण या तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. दरम्यान, या घटनेमुळे सुगाव गावावर शोककळा पसरली आहे.

## आसारामला हायकोर्टाने अंतरिम जामीन नाकारला, ३० ऑगस्टपर्यंत आत्मसमर्पण करण्याचे आदेश



नवी दिल्ली: अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या आसाराम बापूच्या अडचणी पुन्हा एकदा वाढल्या आहेत. राजस्थान उच्च न्यायालयाने त्याला वैद्यकीय कारणास्तव मिळालेला अंतरिम जामीन वाढवण्यास स्पष्ट नकार दिला आहे. न्यायालयाच्या या निर्णयानंतर आसारामला ३० ऑगस्टपर्यंत जोधपूर मध्यवर्ती कारागृहात आत्मसमर्पण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

कोर्टाचा निर्णय कशावर आधारित?

जोधपूर उच्च न्यायालयाचे न्यायाधीश दिनेश मेहता आणि न्यायमूर्ती विनीत कुमार माथुर यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. अहमदाबादच्या सिव्हिल हॉस्पिटलने सादर केलेल्या वैद्यकीय अहवालाचा आधार घेत कोर्टाने म्हटले की, आसारामची सध्याची आरोग्य स्थिती स्थिर आहे आणि त्याला रुग्णालयात राहण्याची गरज नाही.

याआधी मिळालेला जामीन:

यापूर्वी, आसारामला वैद्यकीय कारणास्तव जामीन मिळाला होता, कारण त्याच्या हृदयाची स्थिती गंभीर असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले होते. मात्र, आताच्या अहवालात त्याची प्रकृती स्थिर असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर न्यायालयाने जामीन वाढवण्याची याचिका फेटाळून लावली.

पुढील मार्ग काय?

उच्च न्यायालयाने हे देखील स्पष्ट केले आहे की, भविष्यात जर आसारामच्या आरोग्यात पुन्हा गंभीर बिघाड झाला, तर तो पुन्हा जामिनासाठी अर्ज करू शकतो. मात्र, सध्या त्याला पुन्हा तुरुंगात परत जावे लागेल.

## जरांगे आरक्षण मिळेपर्यंत पाणी पण बंद करणार

मुंबई : ओबीसी कोट्यातून सरसकट मराठा समाजाला आरक्षण मिळावे अशी मागणी करत मनोज जरांगेंच्या नेतृत्वात त्यांचे समर्थक मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलन करत आहेत. जरांगेंनी बेमुदत उपोषण सुरू केल्याचे जाहीर केले आहे. आरक्षणासाठी आंदोलन करत असलेल्या जरांगेंनी मागण्या पूर्ण होत नसतील तर चौथ्या दिवसापासून पाणीही घेणार नसल्याचे जाहीर केले आहे. सरकार ऐकत नसेल, मागण्या मान्य होणार नसतील तर उपोषण आणखी कडक करणार. आता पाणीही पिणार नाही असे जरांगेंनी जाहीर केले. आरक्षण घेतल्याशिवाय मुंबई सोडणार नसल्याचे जरांगेंनी जाहीर केले. कुणी रेनकोट, छत्र्या वाटत असतील तर एक रुपया देऊ नका. काही लोकांनी धंदा सुरू केला आहे.

## शिवसेना (उबाठा) गटाला गळती सुरूच आणखी एक उपजिल्हा प्रमुख शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपात



छत्रपती संभाजीनगर - शिवसेना (उबाठा) गटाला गळती सुरूच असून त्याचे उपजिल्हाप्रमुख मिथुन व्यास यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला आहे.या वेळी भारतीय जनता पार्टी, शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांच्या अध्यक्षते खाली आणि माजी केंद्रीय वित्त राज्यमंत्री तथा खासदार डॉ भागवत कराड यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा सोहळा संपन्न झाला

यावेळी महाराष्ट्राचे लोकप्रिय कॅबिनेट मंत्री नामदार अतुल सावे आणि भाजपा महाराष्ट्राचे सरचिटणीस तथा आमदार संजय केणेकर यांनी फोनवरून सर्व प्रवेशकर्त्या कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या.

आज तापडिया नाट्यगृह निराला बाजार येथे मा केंद्रीय अर्थराज्यमंत्री खा. श्री. भागवत कराड, शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, माजी महापौर बापू घडामोडे, भाजपा प्रदेश प्रवक्ता तथा मा उपमहापौर प्रमोद राठोड, प्रदेश सचिव किरण पाटील, प्रदेश कार्यकारिणी सदस्य अनिल मकरीये, प्रदेश सचिव सौ. शालिनी बुंधे, मा. प्रदेश उपाध्यक्ष बसवराज मंगरुळे, माजी नगरसेवक जगदीश सिद्ध, शहर सरचिटणीस ॲड. ताराचंद गायकवाड, शहर सरचिटणीस हर्षवर्धन कराड, शहर सरचिटणीस रामेश्वर भादवे, शहर सरचिटणीस सौ. छाया खाजेकर, कचरू घोडके, उपाध्यक्ष महेश माळवदकर, डॉक्टर उज्वला दहिफळे, जालिंदर शेंडगे, शिवाजी दांडगे, राहुल दांडगे. यांच्यासह छत्रपती संभाजीनगर मधील भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत मिथुन व्यास यांचा कार्यकर्त्यांसह भव्य पक्ष प्रवेश सोहळा पार पडला, या पक्षप्रवेशावेळी शेकडो कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला.

यावेळी शहर जिल्हा अध्यक्ष किशोर शितोळे आणि डॉ.भागवत कराड यांनी आपल्या भाषणामध्ये भारतीय जनता पार्टीमध्ये काम करणाऱ्या आणि सर्व समाज घटकांच्या कार्यकर्त्यांचा मान सन्मान होतो व त्यांना विविध संध्या उपलब्ध करून दिल्या जातात असे म्हणाले तर भाजपाचे शहर जिल्हा सरचिटणीस ॲड. ताराचंद गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले .

## महिला बचत गटांना गणपती बाप्पा पावला; सहा हजार ४३ मूर्ती विक्रीतून मिळाले २७.१६ लक्ष

सोयगाव,दि.३१ ऑगस्ट - उमेद गणेशोत्सव २०२५ अंतर्गत वीस विक्री केंद्रातून महिला बचत गटांनी ६ हजार ४३ मूर्ती विक्रीतून २७ लक्ष १६ हजार ७०९ रु रक्कम वीस बचत गटांना मिळाली असल्याची माहिती गटविकास अधिकारी दादाराव अहिरे यांनी दिली दरम्यान महिला बचत गटांमधील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी पंचायत समितीच्या उमेद अभियानाने हा उपक्रम राबविला होता या उपक्रमात वीस महिला बचत गटांच्या हात बळकट झाले आहे.

सोयगाव सह तालुक्यात वीस बचत गटांनी गणपती विक्री केंद्र उभारून सहा हजार ४३ गणेश मूर्त्यांची विक्री केली आहे.सोमवार ते बुधवार तीन दिवसांत २७ लक्ष १६ हजार ७०९ रु ची विक्री केली आहे. दरम्यानउमेद गणपती महोत्सव २०२५ साठी सोयगाव शहरात सोयगाव पंचायत समिती आवारात,बाजार पट्टा, बस स्टँड,व आठवडे बाजार या चार ठिकाणी विक्री केंद्र उभारण्यात आले होते तालुक्यातील ग्रामीण भागातील आमखेडा, किन्ही,बनोटी, फरदापुर,गोंदेगाव,पळसखेडा,नांद गाव, निंभोरा, बहुलखेडा या ठिकाणी गणेश मूर्ती विक्री केंद्र उभारण्यात आले होत. यासाठी-तालुका अभियान व्यवस्थापक तुषार बरगट , तालुका व्यवस्थापक प्रेमनाथ राठोड, सखुबाई पवार, मनोज राठोड, प्रभाग समन्वयक सत्य विजय राठोड, सज्जन बिलारी तसेच निलेश खोडके, ऋषिकेश देशमुख, समाधान घुगे आदींनी पुढाकार घेतला होता.

## सोयगावच्या ग्रामीण भागातील खरिपातून बाजरी पीक होतेय हद्दपार

सोयगाव,दि.३१ ऑगस्ट - पिकवले तर भाव मिळेलच याची कोणतीही शाश्वती नाही, या परिस्थितीमुळे शेतकरी बाजरी पिकाकडे पाठ फिरवत आहेत.काढणीच्या वेळी मजुरांचा नकार,अंगाला खाज सुटण्याचा त्रास,तसेच पावसामुळे बाजरी काळी पडून मातीमोल दराने विकावी लागण्याचा अनुभव वारंवार शेतकऱ्यांना येत असल्याने बाजरी पेरणीचा टक्का घटत आहे.पूर्वी ग्रामीण भागात सर्वाधिक पेरणी ही बाजरीची होत असे.गावोगावी घराघरांत पोत्यांची थप्पी लावून बाजरीची साठवणूक केली जात असे.पेरणीसाठी किंवा आर्थिक अडचणीच्या काळात शेतकरी हीच बाजरी बाजारात विक्रीला नेऊन गरज भागवत असे काळ बदलला तसे संकरित वाण आणि जास्त उत्पादन देणारी नगदी पिके आली.यामध्ये कपाशी,सोयाबीन,भुईमूग,मका व भाजीपाला यांसारख्या पिकांकडे शेतकऱ्यांचा ओढा वाढला आहे. खरिपात हायब्रीड बाजरी घेतल्यास धान्यासोबत कडबाही मिळतो.गेल्या काही वर्षापासून या पिकावर खरिपात रोगाचा व अळ्यांचा प्रादुर्भाव होत आहे.बाजरी आर्थिकदृष्ट्या फारसा फायदा देत नसल्याने ती हळूहळू शेतातून बाद होत गेली. ग्रामीण भागात आहारात गव्हापेक्षा बाजरीचे पोषणमूल्य जास्त मानले जात आहे.शहरांमध्ये मागणी वाढत असली तरी शेतकऱ्यांना विक्रीसाठी समाधानकारक भाव मिळत नाही.त्यामुळे ग्रामीण भागातील खरिपातून बाजरी जवळजवळ हद्दपार होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस साजरा; विद्यार्थांना त्यांच्या जीवनकार्याविषयी जीवनपट दाखवला

सोयगाव,दि.३१ ऑगस्ट - येथील कै.बाबुरावजी काळे मराठी शाळेत भारतीय हॉकीचे जादुई खेळाडू मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस साजरा करण्यात आला.दि.२९ ऑगस्ट हा दिवस भारतात राष्ट्रीय क्रीडा दिवस म्हणून साजरा केला जातो.१९२८,१९३२ आणि १९३६ साली भारतीय हॉकी संघाला ऑलिम्पिकम सुवर्णपदक मिळवून देणारे खेळाडू ध्यानचंद सिंग यांचा हा जन्म दिवस ध्यानचंद यांचा जन्म २९ ऑगस्ट १९०५ रोजी इलाहाबाद येथे झाला.त्यांचे वडील समेश्वर सिंग हे ब्रिटिश भारतीय सेनेत होते.ध्यानचंद यांनी त्यांच्या १९२६ ते १९४८ सालापर्यंतच्या क्रीडा कारकिर्दीत ४०० हून अधिक गोल्स केले.लहान वयात ध्यानचंद यांना खेळाबद्दल विशेष आकर्षण नव मात्र त्यांना कुस्ती आवडत असे.पुढे रांची येथे स्थायिक झाल्यानंतर त्यांना हॉकी खेळाबद्दल रस निर्माण होऊ लागला. वयाच्या १६व्या वर्षी ते भारतीय लष्कर भरती झाले,असे प्रतिपादन क्रीडा शिक्षक प्रा.संदीप निकम यांनी केले.ते आज राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.विद्यार्थांना त्यांच्या जीवनकार्याविषयी जीवनपट दाखवण्यात आला. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक प्रा.नीलेश पाटील, उपमुख्याध्यापक प्रा.ज्ञानेश्वर एलिस,पर्यवेक्षक सागर घाटे, प्रा.योगेश काळे,जयश्री श्रीवास्तव आदी उपस्थित होते.

## गिग वर्कर्स सह सर्व असंघटित कामगाराची ई-श्रम नोंदणी विशेष अभियान राबविणे

बिडकीन दि ३१ ऑगस्ट -सर्व असंघटित कामगारासाठी भारत सरकारने ई-श्रम पोर्टल तयार केलेले असून त्या पेर्टलवर सर्व असंघटित कामगार जसे की शेती,पशु, संवर्धन, दुग्ध, घरगुती व व्यावसायीक ड्रायव्हर, बिडी कामगार,हमाल, इत्यादीसह , जवळपास तोनशे चाळीस व्यवसायातील असंघटित उद्योगातील संघटित कामगारांना नोंदणी करता येईल (यांना ईनमक टॅक्स व प्राव्हीट फंड लागू आहेत ते वगळून ) सर्व संघटित कामगारांना साठी भारत सरकारने दि २५ ऑगस्ट ते ०५ सप्टेंबर या कालावधीत विशेष नोंदणी अभियान ठेवलेले आहे या कालावधीमध्ये सर्व असंघटित कामगारानी आपली ई-श्रमची नोंदणी करुन घ्यावी नोंदणीसाठी वय मर्यादा २८ ते ५१ वर्ष असून जवळच कॉमन सविस सेंटरवर अथवा मोबाईलवर ई -श्रमच्या वेब साईटवर जाऊन ही नोंदणी करत येते,तरी प्लॅटफॉर्म वर्कर्स व व संघटित कामगार यांनी विशेष नोंदणी अभियानात जास्तीत जास्त नोंदणी करावी असे आव्हान नितीन पाटणकर कामगार उप आयुक्त छत्रपती संभाजीनगर, सहाय्यक कामगार आयुक्त यु स पडियाल यांनी केलेले आहे.

## कॅल्शियमच्या ब्लॉकेजवर शॉकवेव्ह बलूनद्वारे इन्ट्राव्हॅस्क्युलर लिथोट्रिप्सीचे उपचार

### मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये बायपास आणि अँजियोप्लास्टी झालेल्या दोन रुग्णांना जीवनदान



छत्रपती संभाजीनगर : कॅल्शियम जमा झाल्याने ब्लॉकेज झालेल्या हृदयाच्या धमनींत अत्याधुनिक शॉकवेव्ह बलूनद्वारे इन्ट्राव्हॅस्क्युलर लिथोट्रिप्सी (आयव्हीएल) स्टेंट टाकण्यात आला. या पद्धतीचा उपचार करून दोन रुग्णांना जीवनदान देण्यात मेडिकव्हर हॉस्पिटलच्या हृदयरोग तज्ज्ञांना यश मिळाल्याचे कार्डिओलॉजिस्ट डॉ. तुकाराम औटे यांनी सांगितले.

कार्डिओलॉजिस्ट डॉ. तुकाराम औटे म्हणाले, काही कोरोनरी आर्टरी डिसीज प्रकरणांमध्ये हृदयाच्या मोठ्या धमन्यांमध्ये कॅल्शियम जमा होऊन रक्तप्रवाह कमी होतो आणि गंभीर दुष्परिणामांचा धोका वाढतो. सुमारे ३० टक्के कोरोनरी लेझनमध्ये मध्यम ते गंभीर प्रमाणात कॅल्शियम आढळते. या कॅल्शियममुळे अँजियोप्लास्टीदरम्यान स्टेंट पोहोचवणे, विस्तार करणे कठीण होते व उपचारात गुंतागुंत वाढते. अशावेळी 'शॉकवेव्ह' बलून वापरून कोरोनरी इन्ट्राव्हॅस्क्युलर लिथोट्रिप्सी (आयव्हीएल) ही नवी तंत्रज्ञान प्रणाली या समस्येवर प्रभावी ठरते.

या प्रक्रियेत जनरेटर विद्युत तरंग निर्माण करून विशेष लिथोट्रिप्सी बलूनमार्फत धमन्यांपर्यंत पोहोचवतो. दर सेकंदाला निर्माण होणारे हे प्रेशर वेव्ह ऊतकांना इजा न करता, कॅल्शियमच्या पृष्ठभागावर व आतील थरांवर सूक्ष्म फ्रॅक्चर तयार करतात. त्यामुळे धमनीची लवचिकता वाढून स्टेंट सहज बसवता येतो आणि रक्तप्रवाह सुधारतो. ही पद्धत सुरक्षित, प्रभावी आणि सोपी असून गंभीर कॅल्शियमयुक्त ब्लॉकेजमध्ये मोठा फायदा देऊ शकते, असे हृदयरोग तज्ज्ञ डॉ. तुकाराम औटे यांनी सांगितले.

गंगापूर तालुक्यातील ७१ वर्षीय रुग्णाला २०२० मध्ये अटॅक आला होता. त्यावेळी बायपास शस्त्रक्रिया करण्यात आली होती. पुन्हा त्रास होत असल्याने ते मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. त्यांची अँजियोग्राफी केली असता, पूर्वी बायपास केलेली एक धमनी सुरळीत होती, तर दुसऱ्या धमनीत ९० टक्के ब्लॉकेज होते. कॅल्शियममुळे झालेले ते ब्लॉकेज असल्याने आयव्हीयूएस या अत्याधुनिक यंत्राद्वारे सोनोग्राफी कॅमेरातून त्या धमनीची ॲनाटॉमी आणि मॉर्फोलॉजी जाणून घेण्यात आली. त्यानुसार योग्य मापे घेऊन शॉकवेव्ह बलूनद्वारे ६० शॉक देत मार्ग मोकळा करून इन्ट्राव्हॅस्क्युलर लिथोट्रिप्सी (आयव्हीएल) स्टेंट टाकून अँजियोप्लास्टी करण्यात आली. त्यानंतर आयव्हीयूएसद्वारे ही प्रक्रिया योग्य पद्धतीने झाली की नाही ते तपासून प्रोसिजर पूर्ण करण्यात आली.

दुसऱ्या ५६ वर्षीय रुग्णांची अगोदर अँजियोप्लास्टी झाली होती. रक्तदाब आणि शुगर असलेल्या या रुग्णाच्या अँजियोग्राफीत एका धमनीत मोठे ब्लॉकेज कॅल्शियम जमा झाल्यामुळे झाले होते.

## विष्णुनगर जैन मंदिरात दसलक्षण महापर्वास भक्तीभावाने सुरवात



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - श्री विष्णुनगर चंद्रप्रभु दिगंबर जैन मंदिर येथे पर्युषण पर्व निमीत्त कळस स्थापना ध्वजारोहन करण्यात आला. यावेळी सौधर्म इंद्र नारायणराव क्षिरसागर , पदमाबाई क्षिरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. मंदिराचे अध्यक्ष सुधाकर क्षिरसागर व सर्व विश्वस्त मंडळ उपस्थित होते. पर्युषण पर्व निमीत्त मंदिरात दररोज सकाळी ८ वाजता भगवंताचा अभिषेक शांतीमंत्र पुजन करण्यात येत आहे. तसेच महिला मंडळा तर्फ विधान पुजन होते. रात्री ७ वाजता संगीतमय आरती व संस्कृतीक कार्यक्रम होत आहे. पर्युषण पर्व काळात ९ दिवस दररोज पुजेचा मान बाहुबली वायकोस ,सुधाकर क्षिरसागर, प्रकाश खुळे, महावीर जैन , किशोर क्षिरसागर, संतोष गोसावी, देवेंद्र क्षिरसागर, राहुल गोसावी, विजय क्षिरसागर आदी परिवारांना मिळाला आहे.

तसेच दिनांक २८ ऑगस्ट ते ५ सप्टेबर पर्यत दररोज रात्री महिला मंडळाच्या वतीने विविध धार्मिक व सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन केले आहे. दिनांक ०७ सप्टेबर रोजी बक्षीस वितरण व शोभायात्रा क्षमावली व महाप्रसादाने पर्युषण पर्वाची सांगता होईल महाप्रसाद ९ सप्टेंबर ला सिन्दी भवन येथे होईल. वरील कार्यकम यशस्वी करण्यासाठी मंदिराचे विश्वस्थ मंडळ परिश्रम घेत आहे .

संपादकीय

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

रोखठोक

दिनेश गुणे

# जेव्हा जाणिवा जाग्या होतात...

व्यक्ती आणि समाज यांच्या स्वभावातील साधर्म्य सहजपणे जाणवून देणारा एक सहजपणे येणारा अनुभव अनेकांस आला असेल. रस्त्याकडेच्या फूटपाथवर राहणारे एखादे कुटुंब... घाम फुटेस्तोवर श्रम आणि जिवापाड काबाडकष्ट करून दिवसभरात होणाऱ्या कमाईतून या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. त्यांच्या घराचा दिवस पहाटे, उजाडण्याआधी सुरू होतो आणि सूर्य उगवण्याआधी कुटुंबाच्या दिवसभराच्या गरजांपुरती कामे आटोपून सारे जण घराबाहेर 'जगण्या'साठी बाहेर पडतात. मोलमजुरी, कष्टाची कामे करण्यासाठी घराबाहेर पडणे म्हणजे या कुटुंबांचे 'जगणे' असते. कुटुंबातल्याच कोणा एखाद्यास रात्रपाळीतही कष्टाचीच कामे करावी लागतात. रात्रभर काम करून पहाटे, जेव्हा सारे जग नव्या दिवसाच्या सुरुवातीची तयारी करू लागते, तेव्हा, रात्रपाळी करून शिणलेला तो जीव पहाट फुटण्याआधी कधीतरी घरी परततो, रस्त्याकडेलाच, फूटपाथवर, घराकरिता बनविलेल्या आडोशाच्या बाहेर उघड्यावर टाकलेल्या जुन्या, जीर्ण खाटेवर आपला थकलेला देह झोकून देतो आणि काही मिनिटांतच त्याला शांत झोपही लागते. बाहेर दिवस सुरू झालेला असतो. रस्त्यावर वाहनांची रहदारी सुरू होते, माणसांची वर्दळही वाढते. त्या थकून झोपलेल्या जिवाची आई, घरातील कामे उरकण्याची लगबग करत असते आणि त्या साऱ्या कोलाहलातही, दमलेला 'तो', शांतपणे डाराडूर झोपलेला असतो. आसपासच्या गोंगाटामुळे, गर्दी, रहदारीमुळे त्याची झोपमोड होत नाही. असा कोलाहल पचविण्याची आणि त्याला न जुमानता झोपण्याची त्या मनाला आणि शरीराला सवयच झालेली असते. हळूहळू दिवस वर येऊ लागतो, उन्हं अंगावर येतात आणि बाजल्यावर झोपलेल्या त्याच्या डोक्यापर्यंत पसरतात. तो झोपेतच कूस बदलतो आणि पुन्हा घोरू लागतो. त्याची आई शेजारीच भांडी घासत असते. त्या प्रचंड कोलाहलातच, ती आपल्या मृदू आवाजात झोपी गेलेल्या आपल्या मुलास साद घालते. 'बाळा, ऊठ... बघ, दिवस किती वर आला'...

खरं म्हणजे, त्या आसपासच्या प्रचंड गर्दीच्या गोंगाटात त्या माउलीचा हलक्या सुरातील तो आवाज सहजासहजी कोणाच्या कानावरही पडत नाही, पण रात्रभराच्या श्रमाने शिणून झोपी गेलेल्या त्या बाळाला मात्र, त्या गोंगाटातही आईने आपल्या नावाने मारलेली ती हाक ऐकू येते आणि पुढच्या क्षणाला, झोपी गेलेला तो, जागा होऊन बाजल्यावर बसून डोळे चोळू लागतो.

... समाजाचेही तसेच असते. गर्दीने खचाखच भरून वाहणाऱ्या शहरांत, गावांत, आसपास प्रचंड कोलाहल सुरू असतो, सगळीकडे कोणत्या ना कोणत्या स्वरूपातील असंख्य समस्यांचा गदारोळही सुरू असतो आणि या समस्यांच्या ओझ्याने शिणलेला समाज मात्र ते ओझे अंगावर वाहात स्वस्थपणे पहुडलेला असतो. त्या ओझ्याची त्याला सवयच झालेली असते. अशा वेळी, कोणी तरी आईची भूमिका स्वतःहून शिरावर घेतो आणि समस्याग्रस्त समाजाला त्याच्या नावाने साद घालतो... तशी साद घालावीच लागते, हे त्यालाच ठावूक असते. समाजातील कोणत्याही समूहाला त्याच्या अस्तित्वाच्या, कर्तव्याच्या जाणिवा करून देण्याची गरज असते. समाजाला त्याच्या नावाने साद घातली की त्याच्या अस्तित्वाच्या जाणिवाही जाग्या होतात आणि तो कामाला लागतो. एकदा आपल्यालाच आपली ओळख पटली की त्यामुळे जाग्या होणाऱ्या जाणिवा अधिक क्षमतावान असतात. म्हणूनच, कोणत्याही निद्रिस्त अवस्थेतील समाजाला जागे करण्यासाठी त्याला त्याच्या नावाने साद घालणे गरजेचे असते. भूतकाळात जेव्हा जेव्हा समाज निद्रिस्तावस्थेत गेला, त्याच्या जाणिवा, संवेदना बोथट झाल्या आणि आसपासच्या कोणत्याही कोलाहलाचा त्याच्या अस्तित्वावर काहीच परिणाम होत नाही अशी परिस्थिती निर्माण झाली, तेव्हा तेव्हा त्या समाजास त्याच्या नावाने साद घालून जागे करण्याचे काम कोणीतरी केले. त्यातूनच आंदोलनांचा जन्म झाला. मुळात आंदोलने हे समाजाच्या जाणिवा जाग्या असल्याचेच लक्षण आहे. आंदोलनामुळे समाज सजीव असल्याची खात्री पटते आणि त्यातूनच समाजाच्या माथ्यावरील समस्यांचे ओझेदेखील हलके होते. कारण, काही सामाजिक समस्यांची ओझी वाहून नेणे कोणाही एकट्यादुकट्यास शक्यच नसते. सामूहिकपणाच्या भावनेनेच अशा समस्यांचा सामना करावा लागतो आणि कोणत्याही निद्रिस्त किंवा सुस्त समाजाकडे सामूहिकपणाने असा सामना करण्याची क्षमतादेखील नसते. भूतकाळात जेव्हा जेव्हा कोणत्याही समस्या, मागण्या किंवा सामाजिक प्रश्नांसाठी वेगवेगळी आंदोलने झाली, तेव्हा तेव्हा त्या समस्यांचे ओझे ज्या समाजसमूहाच्या शिरावर होते, त्या समूहास त्याच्या नावाने साद घालावी लागली. तेव्हा आसपास असलेल्या कोणत्याही कोलाहलातही, ती साद त्या निद्रिस्तावस्थेतील समाजाच्या कानावरही पडली आणि ही आपल्यालाच घातलेली साद आहे हे जेव्हा त्याला त्या अवस्थेतही उमगले, तेव्हा तो जागा होऊन समस्यांशी संघर्ष करण्याकरिता सिद्ध झाला, हा आंदोलनांचा, संघर्षाचा आणि हक्काच्या लढाईचादेखील इतिहास आहे.



याचा मागोवा घेण्यासाठी भूतकाळात कितीही मागे गेले, तरी आंदोलनांच्या याच इतिहासाचे अस्तित्व आढळते. त्यामुळे भूतकाळाचा एक नेमका पट उलगडून पाहणेच सोयीचे होते. गेल्या शंभर वर्षांत, जगात, देशात आणि महाराष्ट्रातही असंख्य कारणांनी वेगवेगळी आंदोलने झालीत, त्यातून समाजजीवन ढवळून निघाले आणि समाजाला जागे करण्याचे, त्याच्या जाणिवा जिवंत ठेवण्याचे काम करणाऱ्या या आंदोलनांमुळे समाजजीवनाला एक नेमकी दिशादेखील मिळत गेली. आंदोलनांमध्ये शक्ती असते ही बाब आता सिद्धच झालेली आहे. पण त्यांना नेमकी दिशा सापडली नाही, तर ती भरकटण्याचीही भीती असते. जेव्हा कोणतीही शक्ती योग्य कारणासाठी वापरली जात नाही, तेव्हा त्यापासून फायदा होत नाही. त्यामुळे, दिशा देणाऱ्या मार्गदर्शकावर मोठी जबाबदारी असते. वाघाच्या पाठीवर आरूढ होणे फारसे अवघड नसते. एखाद्यास ते जमतेही, पण पाठीवरून उतरल्यावर पुढे काय होईल याची जाणीव ठेवणे गरजेचेही असते. इतिहासातील अनेक आंदोलनांचे नेतृत्व करणाऱ्यांना याची जाणीव होती, त्यामुळे त्यांची आंदोलने यशस्वी ठरली, समाजालादेखील नेमकी दिशा मिळाली आणि आंदोलने हे परिवर्तनाचे साधन असल्याचेही सिद्ध झाले. त्यामुळे, अशा काही दिशादर्शक आंदोलनांचा मागोवा घेण्याची गरज आज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय क्षेत्रात गेल्या शतकभरातच अनेक आंदोलने झालीत. या आंदोलनांनी महत्त्वाची भूमिकाही पार पाडली. कारण कोणतीही आंदोलने म्हणजे नेहमीच केवळ मागण्या मांडणारी नसतात. अशी आंदोलने समाजाच्या मूल्यांना, शासनाच्या धोरणांना आणि समाजाची सांस्कृतिक ओळख सिद्ध करणाऱ्या नैतिकतेला दिशा देणारीदेखील असतात. उदाहरणांचा धांडोळा घ्यायचा झाला, तर, जवळपास शंभर वर्षांपूर्वी, १९२७ मधील महाड सत्याग्रह आणि १९३० मधील काळाराम मंदिर प्रवेश आंदोलनांकडे पाहता येईल. ही आंदोलने म्हणजे केवळ पाण्याचा किंवा मंदिरप्रवेशाच्या हक्काचा प्रश्नच नव्हता, तर माणूस म्हणून जगण्याच्या मूलभूत हक्कासाठीचा संघर्ष होता. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली दलित समाजाने अस्तित्वाचा हक्क जपण्यासाठी सुरू केलेला स्वाभिमानाचा लढा होता. याच लढाईमुळे, तब्बल सुमारे पंचवीस वर्षांनंतर, १९५६ मध्ये नागपुरातच बाबासाहेबांच्या लाखो अनुयायांनी बौद्ध धर्म स्वीकारला आणि सामाजिक परिवर्तनाचे एक वेगळे पर्व देशाने अनुभवले. समानतेशिवाय प्रगती शक्य नाही, हा धडा या आंदोलनातून महाराष्ट्राने देशालाच नव्हे, तर उभ्या जगाला दिला. स्त्रियांच्या हक्कांबाबतच्या आंदोलनांतूनही हेच घडले. १९७०-८० च्या दशकात, हुंडाविरोधी आंदोलन किंवा अगदी अलिकडच्या शनिशिंगणापूर मंदिर प्रवेश आंदोलनातून स्त्री-पुरुष भेदाच्या मानसिकतेला आव्हान मिळाले आणि लिंग समानतेच्या मुद्द्याला नवा आयाम प्राप्त झाला. हे आंदोलनही केवळ पारंपरिक रूढींना नाहक आव्हान देऊन परंपरांची खिल्ली उडविण्याकरिता नव्हते, तर महिलांच्या सार्वजनिक जीवनातील हक्कांच्या जाणिवा जाग्या करण्याचे काम या आंदोलनांतून सिद्ध झाले होते. हक्कांच्या अशा संघर्षात, त्या प्रश्नाशी निगडित असलेल्या समाजसमूहाला त्याच्या नावाने साद घालण्याचे काम नेतृत्वाने समंजसपणे केले आणि त्याची साद ऐकून समाजही समंजसपणे संघटित झाला. स्वातंत्र्यलढ्यातील भारत छोडो आंदोलन असो किंवा साताऱ्यातील प्रति सरकार आंदोलन असो, अशा आंदोलनांमुळे महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील समाजाला स्वराज्यासाठीच्या संघर्षातील आपल्या जबाबदारीच्या जाणिवा झाल्या आणि या लोकशाहीच्या बीजांवरच, उभा महाराष्ट्र पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीकरिता झालेल्या आंदोलनात उतरून संघर्ष करता झाला. १०५ हुतात्म्यांच्या बलिदानातून निर्माण झालेला महाराष्ट्र म्हणजे अशा आंदोलनांतून उमटलेले मराठी अस्मिता आणि लोकशाहीच्या जाणिवांचे, लोकशाही शक्तीचे ऐतिहासिक उदाहरण ठरले आहे. हीच बाब १९७५ मधील आणिबाणीच्या काळातही सिद्ध झाली. त्या वेळी आणिबाणीविरोधी आंदोलनांनी लोकशाहीला बळ दिले आणि दडपशाहीच्या विरोधात रस्त्यावर उतरलेल्या कार्यकर्त्यांनी पुढे देशाच्या आणि महाराष्ट्राच्या राजकारणातही निर्णायक भूमिका बजावली.

गेल्या शतकभरातील अनेक आंदोलनांत शेतकरी हा घटक केंद्रस्थानी राहिला आहे. शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेने १९८० च्या दशकात, शेतमालाला भरघोस दर मिळावा या मागणीसाठी प्रखर भूमिका घेतली. अगदी अलिकडच्या काळात नाशिक-मुंबई मार्गावर निघालेला शेतकरी मोर्चा हे या आंदोलनातून जाग्या झालेल्या जाणिवांचे आणि शेतकऱ्यास त्याच्या नावाने साद घातल्यामुळे जिवंत झालेल्या जबाबदारीचेच उदाहरण ठरले. या आंदोलनांमुळेच शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा, खाजगी सावकारी पाशातून बाहेर पडण्याचा मुद्दा ऐरणीवर आलाच, पण शेतकरी हा केवळ 'दया दाखविण्याचा' घटक नाही, तर 'हक्क मागणारा' सशक्त नागरिक आहे, ही जाणीवही अधिक घट्ट झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनंतरही, मराठी भाषा आणि मराठीची अस्मिता या मुद्द्यांवरून सुरू असलेला संघर्ष अजूनही संपलेला नाही. याच मुद्द्यांनी मराठी अस्मितेला राजकीय धार दिली आणि मराठीच्या स्वाभिमानाची दिशादेखील महाराष्ट्राला मिळाली. त्यामुळे, गेल्या शतकभरातील अनेक आंदोलनांतूनच, सामाजिक परिवर्तनाचा प्रारंभ झाल्याचे दिसते. अस्पृश्यतेचा अंत, स्त्री-पुरुष समानतेच्या जाणिवा, महाराष्ट्राची निर्मिती आणि लोकशाहीचे बळकटीकरण, शेतकऱ्याच्या प्रश्नांना राजकीय मंचावर मिळालेली प्रतिष्ठा, भाषेच्या अस्मितेतून उमटलेला अभिमान असे अनेक मुद्दे आंदोलनांच्या मार्गाने भक्कम झाले आहेत, हा महाराष्ट्रातील आंदोलनांचा अभिमानास्पद इतिहास आहे. समस्याग्रस्त समाजसमूहास त्याच्या नावाने साद घातल्याचा हा स्पष्ट परिणाम म्हणावा लागेलच, पण या समस्यांची ओझी वाहणाऱ्या समाजास दिशा देण्याचे काम जबाबदारीपूर्वक करणाऱ्या नेतृत्वासही त्याचे श्रेय द्यावे लागेल. महाराष्ट्रात झालेल्या असंख्य आंदोलनांमुळे या राज्यातील समाज सजग झाला आहे. त्याच्या जाणिवादेखील प्रगल्भ झाल्या आहेत. कारण, ही आंदोलने नेहमीच विध्वंसक ठरलेली नाहीत. उलट या आंदोलानांतूनच नवे कायदे, नवे मार्ग आणि नव्या जीवनशैलीची बीजेदेखील रुजलेली दिसतात. त्यामुळेच आज शतकभरानंतरही, महाराष्ट्राच्या समाजसमूहांची संघटितपणे रस्त्यावर उतरण्याची आणि प्रश्न विचारण्याची ताकद तशीच जिवंत आहेत. बदल घडविण्याचे सामर्थ्य असलेल्या आंदोलनांची दिशा भविष्याचे नवे मार्ग आखून देत असते. म्हणूनच, आंदोलनांच्या इतिहासाची ओळख पुसली जाऊ नये. केवळ वाघाच्या पाठीवर स्वार होणे शक्य असेलही, पण त्यावरून उतरल्यानंतर, समोर उभ्या ठाकणाऱ्या परिस्थितीची जाणीव ठेवणेही गरजेचे असते. गेल्या शंभर वर्षांतील सामाजिक, धार्मिक, राजकीय आंदोलनांनी राज्याच्या समाजजीवनावर सखोल परिणाम केला आहे. अनेक आंदोलनांचा समाजजीवनावर सखोल ठसादेखील उमटलेला आहे. महात्मा जोतिबा फुलेंची समानतेची चळवळ आणि तोच वारसा घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेली चळवळ, समानतेच्या हक्कांसाठी महाडच्या चवदार तळ्यावरील सत्याग्रह, दलितांना मंदिरप्रवेशाचा हक्क मिळवून देत स्वाभिमान व सामाजिक न्याय प्रस्थापित करून देणारे काळाराम मंदिरप्रवेशाचे आंदोलन, सत्यशोधक चळवळीतून ग्रामीण भागात सुरू झालेली वैचारिक क्रांती, स्त्री शिक्षणासाठी आगरकर, साने गुरुजी, महात्मा गांधींच्या अनुयायांनी केलेले प्रयत्न, हुंडाविरोधी चळवळ, महिला सक्षमीकरणाच्या मोहिमा, शेतकरी आंदोलने, संयुक्त महाराष्ट्राचा संघर्ष, आणिबाणी आणि आता आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेले आंदोलन, हा गेल्या शंभर वर्षांपासूनच्या आंदोलनांच्या भूतकाळापासून वर्तमानकाळापर्यंतच्या वाटचालीचा इतिहास आहे. समाजाच्या प्रत्येक घटकाने कोणत्या ना कोणत्या आंदोलनात सक्रिय सहभाग घेतलेला आहे आणि आपल्या हक्काच्या जाणिवा जिवंत ठेवल्या आहेत. धार्मिक बाबींवरूनही जेव्हा जेव्हा या राज्यात आंदोलने झालीत, तेव्हाही त्यातून अधिकाराच्या आणि हक्काच्या उपेक्षित बाबींना न्याय मिळाला. मुळात, महाराष्ट्राची सामाजिक संस्कृती सहिष्णू आहे, परिवर्तनाचे संस्कार या मातीला मिळालेले आहेत आणि बदल स्वीकारण्याची मानसिकता या राज्यात रुजलेलीदेखील आहे. त्यामुळेच, या मातीत घडलेल्या आंदोलनांना सामाजिक समंजसपणाचाही वारसा लाभला. हक्क मिळविण्यासाठी झालेल्या कोणत्याही आंदोलनास हिंसाचाराचे गालबोट सहसा लागले नाही आणि हक्क डावलण्याची मुजोर मानसिकताही कधीच महाराष्ट्रात रुजली नाही. सामाजिक नैतिकतेचे याहून दुसरे उदाहरण असू शकत नाही. आंदोलने म्हणजे संघर्ष नव्हे, तर असमानता निर्माण करणारी कारणे दूर करण्याच्या जाणिवांना बळ देणे असते. महाराष्ट्राने ते ओळखले, म्हणूनच महाराष्ट्राच्या समाजजीवनाची संस्कृती समृद्ध झाली आहे. आंदोलनांच्या इतिहासाचा आदर होईल, अशीच परंपरा यापुढेही सुरू राहिली पाहिजे. कारण त्या परंपरेनेच महाराष्ट्राला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे.

dineshgune@gmail.com

प्रासंगिक

सुहास हिरेमठ

# बाळासाहेब पटवर्धन : शाखा निष्ठेचा नंदादीप

बाळासाहेब पटवर्धन यांच्या नावामागे कै.किंवा स्व. लिहिताना हाताला कंप सुटतो.

मी १९६५ साली इयत्ता आठवीत शिकत असताना माझ्या घराजवळच्या मैदानावर नवीन शाखा बाळासाहेब पटवर्धन यांनी सुरू केली. शाखेचे नाव श्रीराम सायं शाखा असे होते. थोड्या दिवसानंतर माझ्या एका मित्राच्या भावाने मला त्या शाखेत नेले. त्या दिवसापासून शाखेत जायला सुरुवात झाली. शाखेची एवढी गोडी लागण्याचे एक कारण बाळासाहेब होते. बाळासाहेब स्वभावाने अतिशय शांत होते त्यांना संतापलेले वा रागावलेले मी कधीही पाहिले नाही. बोलणे देखील मधुर व मृदू होते. त्यामुळे त्यांच्या जवळ जायला, त्यांच्याशी बोलायला कसलीही भीती वाटत नसे. तसा मी लहानपणापासूनच स्वभावाने बुजरा व संकोची होतो व आजही आहे पण बाळासाहेबांची मैत्री सहजच झाली. झाली म्हणण्यापेक्षा त्यांनीच केली म्हणणे अधिक योग्य ठरेल. शाखेविषयी गोडी वाटण्याचे दुसरे कारण म्हणजे शाखेत त्यावेळी होणारे रोजचे व नैमित्तिक कार्यक्रम. बाळासाहेब खेळ फार रंगवून घेत. खेळ कसे घ्यावे, खेळ कसे रंगवावे व आणि स्वयंसेवकांचे मानसशास्त्र लक्षात घेऊन कसे घ्यावेत हे त्यांच्याकडून शिकायला मिळाले.


त्याचप्रमाणे ते पद्य फार सुंदर सांगत. त्यांचा आवाज गोड होता. ते चांगले गायक होते. त्यामुळे शाखेत ते वेगवेगळी सुंदर गीतं सांगत. सर्वांकडून पाठ करून घेत. त्या काळात त्यांनी शिकवलेली सर्व गीतं आजही मला पाठ आहेत. तसेच बाळासाहेब अतिशय सुंदर गोष्टी सांगत. त्यांनी सांगितलेल्या सर्व नाही पण अनेक गोष्टी मी माझ्या कार्यक्षेत्रातील शाखांवर सांगत असे. त्यामुळे प्रचारक म्हणून काम सुरू केल्यावर सुरुवातीला माझ्याकडे हेच भांडवल होते.

त्या काळात शाखेत किमान उपस्थिती ६० व कमाल ८० पर्यंत असायची. किमान तीन गण चालायचे कधीकधी चार गण चालायचे. त्यामुळे शाखेतील वातावरण भारलेले असायचे. त्याचाही एक प्रभाव शाखेत येणाऱ्या स्वयंसेवकांच्यावर असे. म्हणूनच मला शाखा कधी चुकवावीशी वाटली नाही. माझे वडील स्वयंसेवक नव्हते. त्यांना संघाची फारशी माहिती नसावी. शाखेत जात असल्यामुळे माझे अभ्यासाकडे दुर्लक्ष होते असे वाटून एकदा त्यांनी मला शाखेवर जायला बंदी घातली. तरीही मी गेलो असे कळल्यावर मला मारले देखील व दोन दिवस ऑफिस मधून लवकर येऊन मला शाखेत जाण्यापासून रोखले. अभ्यास करायला बसवले. शाखेत प्रार्थनेची वेळ झाल्यानंतर शिट्टी वाजायची. ती ऐकून मी गुपचूप बाहेर येऊन, उभारून प्रार्थना म्हणायचो. वडिलांनी हे पाहिले. त्यानंतर त्यांनी मला कधी विरोध केला नाही. हे सर्व घडले ते शाखेविषयी असणाऱ्या गोडीमुळे आणि त्याला कारण बाळासाहेबच होते.

बाळासाहेब अतिशय कल्पनाशी आणि उपक्रमशील होते शाखेची उपस्थिती वाढावी यासाठी ते कल्पकतेने विविध उपक्रम करत असत गणेशोत्सवाच्या काळात त्यांनी शाखेतल्या गटागटामध्ये कबड्डी व लंगडीच्या स्पर्धा घेतल्या त्यामुळे प्रत्येक गट आपली १०० टक्के उपस्थित राहावे असा प्रयत्न करत असे कोणता तरी गट ठरणारच त्यामुळे दुसऱ्या दिवशी त्यात अनेक जण येत नसत मग दोन मग त्यांनी दोन हरलेल्या गटात पुन्हा स्पर्धा घेतल्या त्याचबरोबर शाखा सुटल्यावर सर्वांकडून ते गणपती व अन्य अर्ध्या आरत्या म्हणून घेत असत पाठ करून घेण्याचाही प्रयत्न करत आणि नंतर गणपतीच्या दहा दिवसात सर्व स्वयंसेवकांनी रोज आपल्या गटातील एका स्वयंसेवकांच्या घरी आरतीला जाण्याची प्रथा रूढ केली आम्ही आठ दहा जण रोज वेगवेगळ्या घरात जायचं त्या घरात अगोदर पासून माहिती असल्यामुळे तेथे सर्व जय्यत तयारी असे आम्हा सर्वांच्या पाच-सहा तरी आरत्या पाठ असल्यामुळे सामूहिक स्वरात आम्ही म्हणत असू त्याचाही परिणाम त्या घरातील वडीलधाऱ्या माणसांच्या मनावर होत असे त्यांच्या मनात संघाविषयीचा आदर वाढत असेल. या उपक्रमामुळे ऐन गणेशोत्सवात देखील शाखेची उपस्थिती किमान ४०-५० असायची.

असेच दिवाळीमध्ये, दिवाळीचे जे चार प्रमुख दिवस असतात त्यावेळी ते शाखा सकाळी घेत ज्यामुळे संध्याकाळी सर्वांना आपापल्या घरी थांबता येई. शाखेवर तीन-चार दिवसात ते फटाके उडविण्याच्या, फराळ खाण्याच्या अशा विविध स्पर्धा घेत. त्याचे वर्णन या लेखात करणे शक्य नाही पण सर्वांना फार आनंद होत असे. याशिवाय प्रत्येक गटाने आपला एक आकाश दिवा तयार करायचा, तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशी तो सर्वांनी शाखेत आणायचा, सर्व आकाशदिवे आतमध्ये दिवा लावून ध्वज मंडला भोवती गोल रचनेत ठेवायचे. चार-पाच स्वयंसेवकांच्या पालकांची एक समिती बनविली होती. ते त्यादिवशी यायचे व त्यात पहिला, दुसरा, तिसरा क्रमांकाचे आकाशदिवे निवडायचे. या सगळ्यामुळे दिवाळीच्या काळातही शाखा उत्तम चालायची.

तिसरा एक उपक्रम त्यांनी केलेला सर्वांच्या लक्षात राहिला. तो म्हणजे दसऱ्यानंतरच्या पौर्णिमेपासून ते मे महिन्यातील पौर्णिमेपर्यंत प्रत्येक पौर्णिमा व त्याच्या आदल्या व दुसऱ्या दिवशी शाखेत सहभोजनाचा कार्यक्रम होत असे. चांदणी भोजन असे त्याचे नाव होते. त्या दिवशी शाखा सायंकाळी सात ते साडे आठ पर्यंत असे. त्याला येताना सर्वांनी डबा घेऊन यायचा अशी सूचना असे. शाखा भरल्यानंतर थोडा वेळ छोटे छोटे खेळ होत. त्यानंतर एक मोठा युद्धाचा खेळ २० मिनिटं चालेल असा ते घेत. मैदानावर तशी आखणी केली असायची. सर्वांचे दोन गट करून तो खेळ होत असे. वीरश्रीपूर्ण घोषणा होत असत. जोरदार खेळ होत असे. त्यामुळे उत्साह व आनंद दोन्ही शतगुणित होत असत. नंतर सर्वांचे एक संचलन त्या कॉलनीत होत असे. बाळासाहेब संचलन गीत सांगायचे. कधी कधी दुसऱ्या स्वयंसेवकांकडून



तयारी करून घ्यायचे. त्यानंतर कोणालातरी गोष्ट सांगायला बोलावलेले असे. ते वक्ते वीस मिनिटात सुंदर ऐतिहासिक, क्रांतिकारकांच्या किंवा पौराणिक कथा सांगत. शेवटी प्रार्थना होऊन शाखा सुटत असे. त्यानंतर सर्वाचे सहभोजन व्हायचे. जेवणं झाल्यानंतरही कोणालाही लगेच घरी जावेसे वाटत नसायचे.

अशा प्रकारे उत्कृष्ट शाखा, शाखेवरील रंजक कार्यक्रम व नियमित उपक्रम यातून अनेक स्वयंसेवकांची शाखानिष्ठा त्यांनी दृढ केली. शाखेत येणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकांच्या घरी बाळासाहेबांचा फार चांगला संपर्क होता ते स्वयंसेवकांना प्रेमाने संपर्काने जोडून ठेवत कार्यकर्त्यांना सांभाळणे टिकविणे आणि घडविणे हे काम ते फार उत्तम करत. मी इयत्ता नववी असताना मला उपघटनायक केले. शाळा सुरू झाल्यावर एका महिन्याने शाळेत सर्वांना सूचना मिळाली की ज्यांना तबला व पेटी (हार्मोनियम) शिकायचा असेल त्यांनी शाळा सुटल्यावर थांबावे. मला संगीताची आवड होती म्हणून मीही थांबलो. त्यादिवशी हार्मोनियमची प्राथमिक ओळख सर्वांना करून दिली. रोज येण्याचा अग्रह त्या शिक्षकांनी केला. घरी यायला साडेसात वाजले. शाखा ६.१५ ते ७:१५ अशी होती. त्यामुळे त्यादिवशी माझी शाखा चुकली. त्याच दिवशी साडेसात नंतर बाळासाहेब माझ्या घरी आले. त्यांनी विचारले आज शाखेत का नव्हतास? त्यावर मी कारण सांगितले. त्यानंतर ते मला म्हणाले अरे माझ्या घरी पण तबला पेटी दोन्ही आहेत. मी तुला शिकवत जाईन. त्यांनी असे म्हटल्यानंतर मी दुसऱ्या दिवशी पासून शाळेत नंतर थांबणे बंद केले. शाखेत नियमित जाऊ लागलो. अर्थात नंतर बाळासाहेबांनी तबला पेटीचा विषय कधीच काढला नाही. त्याचप्रमाणे मला चित्रपट पहायची आवड होती. एकदा आम्ही शाळेतील तीन चार मित्र मिळून संध्याकाळच्या सहा ते नऊच्या शोला गेलो. त्यामुळे माझी शाखा चुकली. दुसऱ्या दिवशी बाळासाहेब घरी आले. त्यांनी काल शाखेत का नव्हतास? हे विचारले. मी खरे कारण सांगितले कारण त्यांच्यासमोर खोटं बोलणं शक्यच नव्हतं. ते अजिबात रागावले नाहीत. संघामध्ये इतक्या वर्षात मी सोडून असंख्य कार्यकर्त्यांचे हे वैशिष्ट्य मी पाहिले आहे. त्यांनी थोडी चित्रपटापटाची कथा विचारली. मी पण रंगवून सांगू लागलो. मग मध्येच मला थांबवत म्हणाले अरे मला सुद्धा चित्रपट पाण्याची फार आवड आहे. तुला जेव्हा अशी इच्छा होईल तेव्हा मला सांग आपण दोघेही चित्रपट पाहायला जाऊ. अर्थात नंतर त्यांनी कधी विचारले नाही, मी कधी म्हटले नाही पण शाखेतील नियमितता व सातत्य मात्र त्यांच्यामुळे टिकून राहिले.

मी दहावीत असताना त्या वेळचे सोलापूर शहर कार्यवाह श्री बाळासाहेब पात्रुडकर यांनी दिवाळी सुट्टीत मला विस्तारक जायला सांगितले. त्या वेळचे जिल्हा प्रचारक मधुकरराव बापट यांनी करमाळा तालुक्यात जेऊर येथे जाण्यास सांगितले. संपर्काचे नाव व पत्ता व पत्र दिले. त्याप्रमाणे मी जेऊरला गेलो. तेथे फारच चांगली शाखा सुरू झाली. अचानक पाचव्या दिवशी तेथे बाळासाहेब पटवर्धन आले. मला फार आश्चर्य वाटले व आनंदी झाला. आम्ही संध्याकाळी शाखेवर गेलो. त्यांनी एका गणाचे खेळ घेतले. एक छानशी गोष्ट सांगितली. रात्री जेवणानंतर ते सोलापूरला परत गेले. त्यांच्या येण्याने मला आनंदही झाला व माझा उत्साह पण वाढला. त्याचप्रमाणे मी १९७३ च्या जून महिन्यात सांगली जिल्ह्यात प्रचारक गेलो. पहिल्या वर्षी विटा व तासगाव असे दोन तालुके होते. दुसऱ्या वर्षी त्याच जिल्ह्यातील वाळवा आणि ३२ शिराळा असे दोन तालुके मिळाले. तालुके बदलल्यानंतर मी बाळासाहेबांना माहितीसाठी कळवले आणि शिराळा येथे नागपंचमीचा मोठा सण होतो. तेथील तरुण आदल्या दिवशी मोठ्या प्रमाणात नाग पकडतात. त्या नागांची पूजा होते, मोठी मिरवणूक निघते व दुसऱ्या दिवशी ते तरुण सर्व पकडलेल्या नागांना त्यांच्या त्यांच्या बिळात नेऊन सोडतात असा तो रोमहर्षक उत्सव असतो. हे सर्व मी बाळासाहेबांना कळवले आणि असा उत्सव यावर्षी मला बघायला मिळणार हा आनंदही त्या पत्रात व्यक्त केला. त्या उत्सवाच्या दिवशी मी आणि ईश्वरपूर (वाळवा) तालुका कार्यवाह अण्णाजी बेळगी तो उत्सव पाहण्यासाठी गेलो. आम्ही ते पहात पहात चाललो होतो आणि अचानक बाळासाहेब पटवर्धन समोर येऊन उभे राहिले. मला आश्चर्यच वाटले आणि आनंदही झाला. लग्न करून सासरी गेलेल्या मुलीच्या घरी जर अनपेक्षितपणे तिचे वडील दरवाजात येऊन उभे राहिले तर जो आनंद त्या मुलीला होतो तोच मला झाला. अर्थात प्रचारकांना सासर कधीच नसते. कुठेही गेले तरी त्यांच्यासाठी ते माहेरच असते. तुम्ही असे न कळवता अचानक कसे आलात? असे मी विचारल्यानंतर ते म्हणाले काल माझ्या मनात अचानक आले की शिराळ्याला जाऊ. उत्सवही बघायला मिळेल आणि तुझी भेटही होईल. एवढ्या प्रचंड गर्दीत आमची भेट झाली याचे कारण त्यांची अनिवार ओढ व त्याचं प्रबळ इच्छा हेच असावे. रात्री आम्ही शिराळ्याहून ईश्वरपूरला आलो. तालुका कार्यवाहनी त्यांना जेवण व मुक्काम करण्याचा खूप आग्रह केला पण त्यांनी नाही म्हटले. योगायोगाने बस स्थानकावर त्यांना लगेचच सांगलीला जाणारी गाडी मिळाली व सांगलीला जाऊन पुढे ते सोलापूरला गेले. बाळासाहेब असे कां आले असावेत याचा मी जेव्हा विचार करतो तेव्हा दोनच कारणे मला वाटतात. एक त्यांचं माझ्यावर असणारे प्रेम आणि दुसरं त्यांना माझ्याविषयी असणारी काळजी जी मी कधीही विसरणार नाही.

बाळासाहेब जरी गृहस्थी असले तरी मनाने ते प्रचारकच होते. त्यांच्या मनात सदैव संघ कार्याचाच विचार असायचा. जेवढे जमेल व जसे जमेल तसे संघ कार्य ते करत राहिले. जबाबदारी नसतानाही त्यांनी कार्य केले. त्यांची शाखा निष्ठा आढळ होती. मी त्यांना १९६५ पासून पहात आलो पण त्यापूर्वीही ती तशीच असावी. त्यांची शाखा अपवादातच चुकली असावी. ज्या कुठल्या शाखेवर ते जात तिथे जे जमेल ते सहकार्य करत राहिले. आणीबाणी लागली तेव्हा ते दिल्लीला होते. पाच जुलैला संघावर बंदी आली पण त्यावेळी ती सर्वांना रात्री रेडिओच्या बातमीतून आणि दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रातून समजली. बहुदा दिनांक ५ जूनलाच सकाळी बाळासाहेबाना शाखेत जायचे होते पण त्या भागात शाखा कुठे लागते हे माहिती नव्हते म्हणून विचारायला ते थेट पोलीस स्टेशनमध्येच गेले. तेथे बसलेल्या पोलीस अधिकाऱ्याला त्यांनी आपला परिचय करून दिला आणि या भागात शाखा कुठे भरते? असे विचारले. त्या इन्स्पेक्टरलाही थोडे आश्चर्य वाटले. त्याने त्यांना विचारले आप ठठड के हरळ? त्यांनी होय म्हंटले. त्यावर तो म्हणाला मी तुम्हाला अटक करतो कारण सरकारने संघावर बंदी घातली आहे. त्याने बाळासाहेबांना सक्तीने बसवून घेतले. नंतर बाळासाहेबांचे नातेवाईक आले. पोलीस अधिकाऱ्यांना समजावून सांगितले आणि मग बाळासाहेबांची सुटका झाली. शाखा निष्ठेचा असा Side Iffect बाळासाहेबांनी प्रथमच अनुभवला असावा. पुण्यात गेल्यावरही ते नियमित शाखेत जात असत. शाखेत सांघिक गीत सांगत. त्यांच्या आवाजावर शाखेतील सर्व स्वयंसेवक खुश असायचे. पुढे प्रकृतीमुळे शाखेत जाणे शक्य होत नव्हते तेव्हा ते आणि वहिनी त्यांच्या खोलीतच रोज प्रार्थना म्हणत असत. जीवनाच्या अंतापर्यंत त्यांची शाखा निष्ठा आढळ राहिली. मी मागे वळून पाहतो तेव्हा जाणवते की मला संघात सर्वात अगोदर पासून प्रेम देणारे बाळासाहेब पटवर्धन होते. त्या उभयतांनी मला खूप प्रेम दिले. मागे एका कार्यक्रमात मी सांगितले की मी संघात आल्यानंतर मला तीन बा मिळाले. त्यातले पहिले बाळासाहेब पटवर्धन, दुसरे बाळासाहेब पात्रुडकर आणि तिसरे बापूराव सारोळकर. यांना जरी बा म्हटले तरी त्यांनी प्रेम मात्र आईसारखे केले. तिघांच्याही पत्नीने असेच प्रेम मला दिले. बाळासाहेबांच्या निधनानंतर मी वहिनींना भेटायला गेलो होतो. त्यावेळी त्यांनी सांगितले की तीन दिवसापूर्वी मला भगवान शंकर दिसले असे बाळासाहेब म्हणाले. आज लक्षात येते मृत्यूनंतर प्रत्येकाच्या मागे कैलासवासी शब्द लागतो पण बाळासाहेब पुण्यात्माच होते कारण त्यांना कैलासावर येण्याचे निमंत्रण प्रत्यक्ष कैलासपतीनेच दिले. या पुण्यात्म्याला माझे कोटी कोटी अभिवादन व विनम्र श्रद्धांजली.

**(लेखक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य आहेत.)**

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# नागरिकांनी गणेशोत्सव मोठ्या आनंदात व शांततेत साजरा करावा-तहसीलदार शेळके

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ ऑगस्ट**

श्री गणेशोत्सव आनंदात आणि शांततेत साजरा करण्याची आपली हिंदू संस्कृती आहे त्या हिंदू संस्कृतीला अनुसरून बीड शहरासह तालुक्यातील नागरिकांनी श्री गौरी गणपती सण मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करावा असे आवाहन बीडचे दबंग कर्तव्यदक्ष तहसीलदार मा श्री चंद्रकांत शेळके साहेब यांनी लोकशाही पत्रकार संघाचा धानोरा रोडचा राजा गणेश मंडळाच्या वतीने येथे 'श्री' च्या आरतीच्या निमित्ताने केले. प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने धानोरा रोड परिसरात लाडक्या गणरायाची स्थापना करण्यात आली. या स्थापनेच्या दुसऱ्या दिवशी सकाळची आरती लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य व जिल्हाध्यक्ष साहस आदोडे यांच्या शुभहस्ते करण्यात आली. सायंकाळची आरतीसाठी बीडचे कर्तव्यदक्ष दबंग तहसीलदार म्हणून ज्यांची ख्याती आहे असे चंद्रकांत शेळके आणि देव देश आणि धर्म यासाठी सातत्याने आपल्या कार्यामध्ये व्यस्त असणारे असे भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा बीड जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे पाटील यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्या नंतर सायंकाळी सातच्या सुमारास तहसीलदार चंद्रकांत शेळके आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे पाटील यांच्या शुभहस्ते श्री ची आरती करण्यात आली. आरती संपन्न झाल्यानंतर बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी थोडक्यात आपले सुसंस्कृत मनोगत व्यक्त करताना सांगितले की आपण सर्वांनी सर्व सण आनंदात आणि शांततेत साजरा करण्याची हिंदू संस्कृती आहे. त्या हिंदू संस्कृतीला अनुसरून बीड शहरासह तालुक्यातील नागरिकांनी श्री गौरी गणपती सणा सह इतर सर्व सण मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरे करावेत असे आवाहन देखील बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले.तसेच देव, देश आणि धर्म



या साठी आपण सर्वांनी मिळून सातत्याने आपले धार्मिक कार्य सामाजिक कार्य हे अतिशय उत्सुकतेने आपण सर्वांनी हे मिळून मिसळून काम आपले कर्तव्य म्हणूनकेले पाहिजे असे प्रतिपादन लोकशाही संघाच्या वतीने वतीने स्थापित करण्यात आलेल्या श्री गणेशाच्या आरती नंतर थोडक्यात अभ्यासपूर्वक आपले मनोगत व्यक्त करताना भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी या वेळी सांगितले. आरती नंतर तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचा सत्कार लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य व बीड जिल्हाध्यक्ष सहस आदोडे यांनी सत्कार केला. तर भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांचा सत्कार लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर व नितेश उपाध्ये यांनी केला.या आरतीच्या निमित्ताने तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या धर्मपत्नी याही उपस्थित होत्या. त्यांचा सत्कार ॲड सुप्रिया गिरी यांनी केला. यावेळी लोकशाही पत्रकार संघाचे मराठवाडा कार्याध्यक्ष आत्माराम वाव्हळ, शिवप्रसाद सिरसाट, अविनाश कुलकर्णी सहआदी उपस्थित होते.

# माजलगाव शहरात गणराया अवार्ड योजना-डॉ.प्रशांत पाटील

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३१ ऑगस्ट**

माजलगाव तालुक्यातील गणेश मंडळांसाठी भारतीय जनता पार्टी व परशुराम हिंदू सेवा संघ यांच्या वतीने गणराया अवार्ड योजना आयोजित करण्यात आली आहे.

यात पहिले बक्षीस रु. ११०००/- ट्रॉफी व प्रमाणपत्र, दुसरे बक्षीस रु.७०००/- ट्रॉफी व प्रमाणपत्र, तिसरे बक्षीस रु.५०००/- ट्रॉफी व प्रमाणपत्र दिले जाणार असून उत्तेजनार्थ अजून काही ट्रॉफी दिल्या जाणार आहेत.तरी या योजनेमध्ये माजलगाव तालुक्यातील सर्व गणेश मंडळानी सहभाग घ्यावा असे आवाहन माजलगाव शहर मंडल अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे.

यासाठी आयोजकांनी खालील प्रमाणे गुण देण्याचे ठरवलेले आहे.

१) पर्यावरण पूरक गणपती = १० गुण, २) स्वदेशी विषयी जनजागृती सजावट / देखावे = ४० गुण,३) ऑपरेशन सिंदूर विषयी देखावे / सजावट = ३० गुण, रक्तदान शिबीर / वैद्यकीय सेवा शिबीर २० गुण असे गुण देण्यात येणार आहेत.यासाठी पोलीस




स्टेशनची परवानगी काढलेले व डी जे मुक्त मिरवणूक काढणारे गणेश मंडळ पात्र असतील.तरी माजलगाव तालुक्यातील सर्व गणेश मंडळानी गणेश उत्सवानिमित्त दहा दिवसांमध्ये घेतलेले वरील गुणांकाचे व वेगवेगळे कार्यक्रम / उपक्रम आम्हाला कळवावेत किंवा ९९२२२२४०३८ या नंबर वर टाकावेत असे आवाहन केले आहे. ज्या गणेश मंडळाला जास्त गुण मिळतील त्या गणेश मंडळास पहिले, दुसरे, तिसरे व उत्तेजनार्थ बक्षीस दिली जाणार आहेत. या कार्यक्रमासाठी भाजपा चे माजलगाव शहर सरचिटणीस पवन मोगरेकर, भाजपा माजलगाव शहर उपाध्यक्ष अविनाश कांडुरे व भाजपा पदाधिकारी नामदेव मुळे हे परीक्षण करत आहेत.गणेश विसर्जनानंतर लवकरच गणराया अवॉर्ड योजनेचे बक्षीस एक छान सा कार्यक्रम घेऊन सर्व विजेत्यांना दिले जाईल असे आवाहन या कार्यक्रमाचे आयोजक भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य, परशुराम हिंदू सेवा संघांचे प्रदेश संघटन सरचिटणीस तथा सिद्धीविनायक अर्बन चे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांत पाटील यांनी केले आहे.




भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा माजी नगरपालिका सभापती नवनाथांना शिराळे पाटील निवड झाल्याबद्दल बीड शहरातील संभाजी महाराज क्रीडांगण येथे बीड शहरातील सर्व मित्रांनी सत्कार केला यावेळी कल्याण रावजी वाघमारे रामनाथ जी डाके भानुदाजी कंठाळे सर बाळासाहेब गावडे सर किसनजी वळेकर शिवाजीराव पवार गायकवाड साहेब वराड साहेब माणिकराव वेदपाठक मसुरे योगेश नाकाडे इत्यादी यावेळी उपस्थित होते

# नामस्मरण हे भगवंताच्या प्राप्तीचे सुलभ साधन आहे

## ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट उपक्रमात ह भ प माधव महाराज डाके यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ ऑगस्ट**

ज्ञानियांचे राजे साधकांचे मायबाप कैवल्य चक्रवर्ती सम्राट माऊली श्री. ज्ञानोबाराय यांच्या ७५० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त एकावन्न श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट उपक्रमांतर्गत आज शनिवार दि.३० ऑगस्ट २०२५ रोजी बीड शहरातील वाडिया वाचनालयाचे ग्रंथपाल गणेश शेंडगे यांच्या घरी मोठ्या उत्साही व आनंदी वातावरणात ज्ञानेश्वरी ग्रंथाचे भव्य दिव्य स्वागत झाले.

यावेळी ग्रंथराज ज्ञानेश्वरी ची ज्ञानदेव तुकाराम या गजरात मिरवणूक काढण्यात आली होती. उपक्रमाचे संयोजक ह.भ.प.माधव महाराज डाके यांनी ज्ञानेश्वरी ग्रंथाची विधिवत पूजा करून सदरील ग्रंथ गणेश शेंडगे व त्यांच्या धर्मपत्नी शेंडगे ताई यांच्या हातात सुपूर्द केला. या नंतर डाके महाराजांनी ज्ञानेश्वरीतील नवव्या अध्यायातील नामजपाचे महात्म्य सांगणारी ओवी निवडून तासाभराचे श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाचे महात्म्य सांगणारे प्रवचन केले.

सदरील या ओवीवर चिंतन मांडताना श्री ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी ग्रंथात नाम साधनेचे महत्व कसे प्रतिपादन केले आहे ते सांगितले.भगवंत प्राप्तीचे विविध मार्ग आहेत. परंतु यामध्ये सर्वात सुलभ साधना नामस्मरणआहे. हा सिद्धांत विविध दृष्टांत देऊन जमलेल्या श्रोत्यांना आपल्या सोप्या भाषेत पटवून दिले . या प्रवचन सेवेमध्ये ज्ञानेश्वर माऊलींनी लिहिलेला हरिपाठ, चांगदेव पासष्टी ,अमृत अनुभव व ज्ञानेश्वरी ग्रंथ यावर सविस्तर भाष्य केले .साधकांचे मायबाप ज्ञानोबारायांना माऊली का म्हटले जाते याचे उत्तर आपणास हरिपाठ मध्ये मिळते हे विशद केले.शेंडगे परिवाराकडे ज्ञानेश्वरी ग्रंथाचे स्वागत गणेश शेंडगे व त्यांच्या धर्मपत्नी सौ.उषा गणेश शेंडगे यांनी केले.ग्रंथराज ज्ञानेश्वरी आगमना निमित्त दारात सुंदर रांगोळी व फुलांची पख रण केलेली होती. गोरज मुहूर्तावर सांजवेळी श्री. ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रत्यक्ष ज्ञानोबारायाच आपल्या घरी येत आहेत हा भाव शेंडगे दांपत्याच्या चेहऱ्यावर दिसत होता. यावेळी दारामध्ये सर्वत्र दिवे लावून दिपपूजन करण्यात आले.त्यानंतर श्री.ज्ञानेश्वरीचे पूजन केले. व महाराजांचे औक्षण केले.घरोघरी एकावन्न ज्ञानेश्वरी सस्नेह भेट या उपक्रमांतर्गत कालच्या या कार्यक्रमाला आई रामकवर शेंडगे, ज्येष्ठ पत्रकार प्रमोद कुलकर्णी, दैनिक चंपावती चे पत्रकार महादेव( नाना )साळुंके गणेश शेंडगे, गुरुप्रसाद शेंडगे, विणेकरी वाल्मीक मामा चाटे,श्रीराम जाधव, डोरले काका व काकू यांच्यासह शिंदे नगर कॉलनी परिसरातील भाविक भक्त व माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# माजलगाव धरण भरले, ९ दरवाजे उघडले

## नदी पात्रात १७ हजार ९८६ क्युसेक पाण्याचा विसर्ग

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३१ ऑगस्ट**



जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे बिंदुसरा व कुंडलिका प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे माजलगाव जलाशयात पाण्याची आवक मोठ्या प्रमाणात झाल्याने माजलगाव धरण शंभर टक्के भरल्यामुळे दि ३० ऑगस्ट रोजी दुपारी जलाशयाच्या ९ दरवाज्यांमधून १७ हजार ९८६ कस्टद्वारे सिंदफणा नदीत पाणी सोडण्यात आले. ही माहिती माजलगाव जलाशयाच्या प्रशासनाने दिली असून नदीकाठच्या गावांना सदर केस हे सतर्कतेचा इशारा देण्यात आलेला आहे.

बीड जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सर्वदूर पावसामुळे लहान मोठ्या नद्या दुथडी भरून वाहत आहेत. तर नाथसागर जलाशयातून सोडण्यात येणारे पाणी माजलगाव जलाशयात येत आहे. त्यामुळे शुक्रवारी रात्री उशिरा जलाशयाचे ३ दरवाजे उघडण्यात आले, त्यानंतर शनिवारी सकाळी ६ आणि दुपारी ९ दरवाजे उघडून सिंदफणा नदीपात्रात पाणी सोडण्यात आले.

सर्व जलाशयाचे दरवाजे उघडले जाण्याची शक्यता

येत्या दोन दिवसांत सतत पाऊस पडत राहिला तर जलाशयाचे एकूण १६ दरवाजा असून सर्व दरवाजे उघडले जाऊ शकतात. सिंधफना नदी आणि गोदावरी काठावर राहणाऱ्या ग्रामस्थांना प्रशासनाने सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे.

# ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ ऑगस्ट**

महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ (एमपीआयडी ॲक्ट १९९९) अन्वये ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत श्री. जॉन्सन यांनी ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासंदर्भात संबंधीत विभागानी केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी बैठकीस पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक एस.एस.शेजाळ, गुन्हे अन्वेषण विभाग (उखऊ) छत्रपती संभाजीनगरचे पोलीस अधिक्षक यशवंत काळे, सहजिल्हा निबंधक वर्ग-२ बीडचे एस.एम.शेख, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, लातूर विभागचे फडणवीस सर, सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बीड / माजलगावचे गौरव इंगोले, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीडचे सतीश तोतावार, जिल्हा सरकारी वकील धनंजय वाकनकर, अवसायक सर्व वित्तीय संस्थाचे आर.एम.तोटे, श्री. साई अर्बन मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.बीडचे व्यवस्थापक सचिन



घोडके, ज्ञानराधा मल्टी स्टेट को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. बीडचे संपर्क अधिकारी गोपाळकृष्ण परदेशी, मॉ जिजाऊ मल्टीस्टेट को-ऑप सोसायटी, बीडचे व्यवस्थापक सुरज जगदाळे यांची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी एमपीआयडी संदर्भातील कामकाज गतीने होण्यासंदर्भात मा. जिल्हा मुख्य न्यायाधीश यांना पत्र देवुन सर्व कोर्टाची बैठक घेण्याबाबत विनंती करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच ज्या प्रकरणामध्ये अधिसूचना प्रसिध्द झालेल्या नाहीत, त्या संदर्भात अपर मुख्य सचिव (गृह) यांना पत्र देवून अधिसूचना प्रसिध्द करुन सक्षम प्राधिकारी नेमणेबाबत विनंती करण्यात येणार आहे. सर्व अवसायक यांना त्यांची कार्यपध्दती निश्चित करणेबाबत सूचित करण्यात आले आहे. तसेच नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य यांना पत्र देवून मालमत्तांच्या मुल्यांकना संदर्भातील माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी एक नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यासाठी विनंती करण्यात आल्याचे सांगितले. तसेच या विषयावर पुढील बैठक एक महिन्यानंतर घेण्यात येणार असल्याचे ही यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल बीड येथे रोज सकाळी दहा ते दोन या वेळेमध्ये मोफत आरोग्य तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३१ ऑगस्ट**

गेल्या पाच वर्षापासून बीड येथे जैन सोशल फेडरेशन अहिल्यानगर व सकल जैन समाज बीड यांच्या सहकार्याने हॉस्पिटल कार्यरत आहे हा अनुभव घेता बीड शहरातील व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांसाठी दानशूर व्यक्तींच्या आर्थिक सहकार्याने रोज सकाळी दहा ते दोन या वेळेमध्ये मोफत जनरल आरोग्य तपासणी करण्याचा उपक्रम हाती घेतला असून या तपासणी करिता बीड शहरातील सुप्रसिद्ध डॉक्टर राजेश पारीख यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे गेली २५ वर्षाचा मेडिकल क्षेत्रातील सेवेचा त्यांना अनुभव आहे त्यामध्ये त्यांचे नाव लौकिक आहे आलेल्या रुग्णांना आजारातून सावरण्या करिता त्यांना धीर देणे आजार समजावून सांगणे त्यामध्ये त्यांचे आहार व दिनचर्या समजावून सांगणे योग्य तेवढीच औषधी देणे असा उपक्रम गेल्या पंचवीस वर्षापासून ते बीड शहरात सेवा करत आहे मूळ वैद्यकीय सेवेचा पाया त्यांनी २५ वर्षापासून कायम ठेवलेला आहे हाच धागा पकडून जैन सोशलच्या विश्वस्तांनी त्यांना रोज चार तास सेवा द्यावी ही विनंती केल्यामुळेच त्यांनी सुद्धा ३२ वर्षाचा मेडिकल क्षेत्राचा अनुभव असलेल्या संस्थेशी त्यांनी काम करण्यास होकार दिला अतिशय मितभाषी आपल्या वैद्यकीय सेवेचा आदर ठेवून असलेले डॉक्टर राजेश पारिक हॉस्पिटलमध्ये रोज सकाळी दहा ते दोन या वेळेमध्ये आलेल्या रुग्णांना तपासणार असून योग्य ती कमीत कमी पैशाची औषधे देऊन त्यांना दुरुस्त करण्याचा संकल्प आनंद ऋषीजी हॉस्पिटल जालना रोड शाहू बँकेच्या बाजूला या सेवेच्या यज्ञाला एक सप्टेंबर २०२५ पासून समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींना साक्षी ठेवून सुरुवात करत आहे तरी सर्व शहरातील व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना विनंती आहे की अतिशय महाग होत चाललेल्या वैद्यकीय सेवेला कमीत कमी योग्य तेवढीच औषधे देऊन रुग्णांना तंदुरुस्त ठेवण्याचा जो उपक्रम संस्थेने व सकल जैन समाज बीड यांनी हाती घेतला असून बीड परिसरातील लोकांनी रुग्णांनी प्रतिसाद द्यावा आपणास चांगला अनुभव आल्यानंतर इतरांना सुद्धा येथे चालू असलेल्या सेवेचा लाभ घेण्याकरिता प्रोत्साहित करावे अशी विनंती जैन सोशल फेडरेशन अहिल्यानगर व डॉक्टर राजेश पारिख व सकल जैन समाज बीड च्या वतीने आवाहन करण्यात आले आहे

# दु:ख मुक्तीसाठी त्रिशरण पंचशीलचे आचरण करणे गरजेचे

## महा-उपोसथ कार्यक्रमात करूणाबोधी महाथेरो यांचे प्रतिपादन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ ऑगस्ट**

तथागत गौतम बुद्धांनी सर्वांना गौतम बुद्धाचा धम्म दिला आहे. या पृथ्वीतलावर अनंत प्रकारे दुःख पसरले असून या दुःखातून मुक्ती प्राप्त करण्यासाठी त्रिशरण पंचशील आचरणात आणणे आवश्यक असल्याचे दिल्ली येथील भंते करुणाबोधी महाथेरो यांनी रविवारी हिंगोली येथील शिवलीला सभागृहात घेण्यात आलेल्या महा -उपोसथ धम्म दिवसानिमित्त कार्यक्रम प्रसंगी मार्गदर्शन करताना सांगितले.

हिंगोली येथे मागील वर्षापासून सुरू करण्यात आलेले महा-उपोसथ धम्मदिवसानिमित्त शहरातील तरुण संयोजन समितीने ३१ ऑगस्ट रोजी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या महाउपोसथ धम्म दिवसाचे हे दुसरे वर्ष असून ३१ ऑगस्ट सकाळी ६.ते सायंकाळी ६ पर्यंत

शिवलीला लॉन्स,अकोला बायपास रोड, हिंगोली येथे एक दिवसीय महा-उपोसथ धम्म दिनाचे आयोजन पूज्य भन्ते करुणाबोधी थेरो, दिल्ली व हिंगोली शहरातील पूज्य भन्ते पय्यावर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

यावेळी उपोसथ म्हणजे काय? यावर बोलताना सांगितले की, भगवान बुद्धांनी उपदेशिलेल्या धम्मानुसार उपोसथाचे पालन जे करतात तेच खरे उपासक उपासिका होत. धम्मामध्ये उपोसथाला खूप महत्व आहे, तर उपोसथ म्हणजे नेमके काय असावे, तर वर्षावासाच्या कालावधीत महिन्यातून केवळ चार दिवस म्हणजेच दोन अष्टमी, पौर्णिमा व अमावस्या अश्या चारही दिवस आपण अष्टशील धारण करून त्याचे नियमाप्रमाणे काटेकोर पालन करणे म्हणजेच उपोसथ. पण आजच्या या धावपळीच्या जीवनात आम्ही धम्मापासुन बरेच दूर होत आहोत हे निदर्शनास येते, म्हणूनच धम्माशी निगडित राहण्यासाठी, उपोसथाला मूळरूपी जाणून घेण्यासाठी व आपल्या पुण्य पारमिताना पूर्ण करण्यासाठी आम्ही पुनः एकदा एक धम्म रूपी प्रयत्न म्हणून एक दिवसीय महा-उपोसथ धम्म दिवस (वर्ष दुसरे) आपल्या सर्वांकरिता आयोजित करण्यात आला आहे.यावेळी अष्ठशीलचे महत्व बौद्ध धर्मामध्ये अत्यंत महत्त्वाचे असून त्याचे ग्रहण व आचरण केल्यास मानवाच्या जीवनामध्ये अमुलाग्र बदल घडवून येऊन सुखी जीवनाचा मंत्र यावेळी दिल्लीचे भन्ते करुणाबोधी महाथेरो यांनी या धम्म प्रवचनामधून विविध अष्टपैलू समजावून सांगत प्रश्न उत्तराचा तासही घेण्यात आला.यावेळी पाणातिपाता वेरमणी सिक्खापदं समादियामि,अदिन्नादाना वेरमणी सिक्खापदं समादियामि,) अब्रम्हचरिया वेरमणी सिक्खापदं समादियामि, मुसावादा वेरमणी सिक्खापदं समादियामि,, सुरामेरसयज्ञ्ज पमादड्डाणा वेरमणी सिक्खापदं समादियामि, विकालभोजना वेरमणी सिक्खापदं समादियामि,

नच-गीत-वादित-विसुक-दस्सन, माला,गंध-विलेपान-धारण-मंडन-विभुसनठाणा,उच्चासयन-महासयना वेरमणी सिक्खापदं समादियामि, या अष्टशिलाचे पालन करण्याचे आव्हान दिल्ली येथील भंते करुणाबोधी महाथेरो व हिंगोली येथील भन्ते पय्यावर्धन यांनी केले आहे.याप्रसंगी शील ग्रहण, त्रिशरण वंदना व परित्राण पाठ, धम्मदेशना, साधना असे विविध कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. शांतिरत्न थोरात,इंजि. धंनजय भगत, सुनील कांबळे, दीपाली पुंडगे, सुनील अंभोरे, कुलदीप कांबळे, संतोष चाटसे, वैभव खिल्लारे, सुनिल इंगोले आदींनी परिश्रम घेतले.

# मराठा समाजाचा हिंगोली ते नांदेड रस्त्यावर रास्तारोको



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ ऑगस्ट**

मुंबई येथील मराठा आरक्षण आंदोलनामध्ये कार्यकर्त्यांची गैरसोय करणाऱ्या शासनाच्या निषेधार्थ सकल मराठा समाजाच्यावतीने रविवारी दि ३१ ऑगस्ट रोजी एक तास हिंगोली ते नांदेड महामार्गावर घोळवा पाटी येथे रास्तारोको आंदोलन करण्यात आले.

मुंबई येथे मनोज जरांगे यांनी सुरू केलेल्या मराठा आरक्षण आंदोलनास हिंगोली जिल्ह्यातून मोठा पाठींबा मिळाला आहे. या आंदोलनात हजारो कार्यकर्ते सहभागी झाले आहेत. या आंदोलनकर्त्यांसमोर शासनाकडून अनेक अडचणी निर्माण केल्या जात असल्याचा आरोप करीत आंदोलनकर्त्यांना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. या परिस्थितीतही आंदोलक मनोज जरांगे यांच्यासोबत ठाण मांडून बसले आहेत. आंदोलकांना हेतूपुरस्सर त्रास दिला जात असल्याचा आरोप कोंढूर दिग्रस येथील सकल मराठा समाजाच्यावतीने करण्यात आला असून हिंगोली ते नांदेड या राष्ट्रीय महामार्गावर घोळवा पाटी येथे रास्तारोको आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. तसेच शासनाच्या विरोधात रोष व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनामुळे हिंगोली ते नांदेड मार्गावरील वाहतुक तब्बल एक तास ठप्प झाली होती. यावेळी मुख्य मार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. आंदोलकांची शासनाने गैरसोय केल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील असा इशारा आंदोलनकांनी दिला. यावेळी कळमनुरी पोलिसांनी चोख बंदोबस्त लावला होता.

# वक्रतुंड बालगणेश मंडळाच्यावतीने महाआरती, भजनसंध्या



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ ऑगस्ट**

शहरातील गड्डे पीर गल्ली येथील वक्रतुंड बाल गणेश मंडळाने यंदाही गणेशोत्सवाचा आनंद द्विगुणीत केला आहे. मंडळाच्या वतीने महिलांच्या भजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.

महिला भजनाच्या कार्यक्रमाने संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता. भजनानंतर सर्व गणेश भक्तांनी मिळून गणेशाची महाआरती केली. या महाआरतीने वातावरण अधिकच मंगलमय झाले होते. आरती झाल्यानंतर उपस्थित सर्व भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.वक्रतुंड बाल गणेश मंडळ हे मागील अनेक वर्षांपासून केवळ धार्मिक कार्यक्रमच नाही, तर विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. यावर्षीही मंडळाने 'एक हात मदतीचा' या उपक्रमांतर्गत गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले. तसेच, 'स्वच्छ गणेशोत्सव, सुंदर हिंगोली' या मोहिमेअंतर्गत मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिसराची स्वच्छता केली. मंडळाच्या यशस्वी आयोजनासाठी अध्यक्ष कुणाल जयस्वाल, तसेच वेदांत मिस्कीन, ओम धन्वने, सोहम डोईफोडे, प्रज्वल पाठक, शमी मिस्कीन, नागेश शिराळे, प्रथमेश धनमने, पार्थ देवगिरकर, रुद्र देवकते, रोहन जयस्वाल, प्रणव डोके आणि प्रणव देवकते यांनी अथक परिश्रम घेतले. या सर्व कार्यक्रमांमध्ये महिला मंडळानेही मोलाची साथ दिली. गल्लीतील महिलांनी एकत्र येऊन भजनाचा कार्यक्रम यशस्वी केला. यात विष्णू पारीक, प्रतिका पाठक, गौरी देवकते, अक्षरा बिडकर, नम्रता ढोके, श्रेया देवगिरकर यांनी विशेष मेहनत घेतली.



हिंगोली- विघ्नहर्ता श्री चिंतामणी गणपतीसमोर शनिवारी रात्री भजनी मंडळाने सुंदर कांड कार्यक्रम साजरा केला. यावेळी भजनी मंडळासह पदाधिकारी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



हिंगोली- शहरातील जुने ग्रामीण पोलिस ठाणे जवळील आनंद बाल गणेश मंडळाच्यावतीने महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. छाया- सुनील पाठक

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रीय क्रिडा दिन उत्साहात साजरा

हिंगोली-हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, हिंगोली यांच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिनाचे आयोजन उत्साहात करण्यात आले. जिल्हा क्रीडा संकुलातील इनडोअर स्टेडियम येथे मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश्वर मारावार यांच्या मार्गदर्शनाखाली विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन झाले. यावेळी राज्यस्तरीय फेन्सिंग स्पर्धा यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल कल्याण देशमुख व संजय भुमरे यांचा सत्कार करण्यात आला.शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त प्रा. डॉ. बंकट यादव यांना क्रीडा दिनाच्या निमित्ताने विशेष शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमाला राष्ट्रीय खेळाडू व वनाधिकारी संदीप वाघ, रमेश गंगावणे, दतराव बांगर, सत्यप्रकाश नांदापूरकर, विशाल शिंदे यांच्यासह क्रीडा क्षेत्रातील मान्यवर खेळाडू व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त झालेले हे आयोजन खेळाडू व युवकांसाठी प्रेरणादायी ठरले.

### प्रभाग क्र. १० ची रचना पुनश्च करावी



हिंगोली-नगर पालिका कार्यालयामार्फत प्रभाग क्रमांक १० ची सीमा भौगोलिक व नैसर्गिक घटनेचा विचार न करता केल्या असून ही रचना पुन्हा करावी असा आक्षेप कैलास श्रीनाथ यांनी केली आहे. नगर पालिकेकडून नगर विकास विभागाने सध्या शहरातील प्रभाग रचना केली आहे परंतु प्रभाग क्रमांक दहा मधील प्रभाग रचना ही भौगोलिक व नैसर्गिक दृष्ट्या चुकीची असल्याचा आरोप कैलास श्रीनाथ यांनी केली आहे. वरील मुद्द्यानुसार प्रभागाची सीमा लोकसंख्या सातत्याने त्याची भाग वस्ती यासारख्या स्थितीत भूचिन्हावर आधारलेले असते त्यामुळे नागरिकांना आपला प्रभाग वार्ड समजायला सोपे जाते. तसेच निवडणुक प्रक्रिया पारदर्शकता राहते परंतु यासर्व बाबी कागदावर दिसून येतात. कुठलाच नियम न पाळता व प्रत्यक्षात जागेवर न जाता टेबलावरच बसून रेखाटून प्रभाग रचना करण्यात आली आहे असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. नगर विकास विभागाच्या आदेशान्वये योग्य ती कार्यवाही करून प्रभाग रचना पुनश्च करावी अशी मागणी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

### ७५ वाहन चालकांविरूध्द पोलिसाची कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७५ वाहन चालकांविरूध्द पोलिसांनी विविध ठिकाणी कारवाई करीत त्यांच्याकडून ६२ हजार ९०० रूपयांचा दंड वसूल केला आहे. तसेच जुगार कायद्यांतर्गत ९ ठिकाणी पोलीसांनी छापे मारले. ६६८० रूपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

# आखाडा बाळापूर बाजार समितीवर शिवसेना-राष्ट्रवादीचा एकतर्फी विजय

## १८ पैकी १७ जागांवर विजय, जल्लोष साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३१ ऑगस्ट**

कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर बाजार समितीच्या निवडणुकीत शिंदे शिवसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाने १८ पैकी १७ जागांवर विजय मिळवत एकतर्फी विजय मिळवला आहे. तर एका जागेवर अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे. या निवडणुकीत ठाकरे शिवसेना, भाजप व काँग्रेस-राष्ट्रवादी शरद पवार गट यांा एकही जागा जिंकता आली नाही.

हिंगोली जिल्ह्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या आखाडा बाळापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांच्या १८ जागांसाठी निवडणुक प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीत शिंदे शिवसेना व राष्ट्रवादी अजित पवार यांचा एक पॅनल तर ठाकरे गट-भाजप-काँग्रेस-राष्ट्रवादी शरद पवार गट यांचा एक पॅनल रिंगणात होता. याशिवाय सरपंच संघटनेने तिसरी आघाडी करून उमेदवार दिले होते. याशिवाय व्यापारी मतदार संघातून दोन अपक्षांनी उमेदवारी दाखल केली होती.

या बाजार समितीवर ताबा मिळवण्यासाठी दोन्ही पॅनलकडून जोरदार यंत्रणा राबविण्यात आली. त्यानंतर शनिवार दि ३० ऑगस्ट रोजी आखाडा बाळापूर, पिंपळदरी, पोतरा येथे मतदान घेण्यात आले. त्यानंतर दि ३१ ऑगस्ट रोजी सकाळी कुसुमताई चव्हाण सभागृहात मतमोजणीला सुरूवात झाली. हमाल मापारी मतदार संघातून दोन उमेदवारांना समानमते मिळाली. त्यामुळे ईश्वर चिठ्ठीने मारोती हेंद्रे विजयी झाले.

शिंदे शिवसेना व राष्ट्रवादीने मिळवलेल्या १७

कार्यकारी सेवा सहकारी संस्था मतदार संघातून ११ तर व्यापारी मतदार संघातून एक तर हमाल मापारी मतदारसंघातून एका उमेदवाराचा समावेश आहे. तर व्यापारी मतदार संघातून अपक्ष उमदेवार शिवचरण गोयंका यांनी बाजी मारली आहे.

या विजयानंतर शिवसेनेचे आ. संतोष बांगर, माजी सभापती संजय बोंढारे, सहसंपर्क प्रमुख राजेंद्र शिखरे, माजी नगरसेवक श्रीराम बांगर, युवाजिल्हाध्यक्ष राम कदम, शेषराव बोंढारे यांच्यासह विजयी झालेल्या उमदेवारांनी विजयाचा गुलाल उधळत जल्लोष साजरा केला. या निवडणुकीत भाजपसह ठारके गट, काँग्रेस तसेच राष्ट्रवादी शरद पवार गटाला एकही जागा मिळवता आली नाही. या विजयानंतर शिवसेनेच्या कार्यकर्त्यानी विजयी मिरवणुक काढीत नवनिर्वाचित संचालकांचा सत्कार केला.

विजयी उमदेवारांमध्ये माजी सभापती दत्ता बोंढारे, दत्ता माने, रावसाहेब अडकिणे, बाजीराव संवडकर, ओम कदम, सुधाकर मुलगीर, मारोती सुर्यवंशी, नंदाताई पतंगे, जयश्री शिंदे, विजय गंगेवार, नीळकंठ नरोटे, गजानन देशमुख, अमोल चव्हाण, दत्तराव सावळे, संजय भुरके, सुनील अमिलकंठवार, मारोती हेंद्रे तर अपक्ष शिवचरण गोयंका यांचा समावेश आहे.

विजयानंतर शिवसेनेचे आ. संतोष बांगर म्हणाले की, ऐन निवडणुकीच्या काळात आईची प्रकृती ठिक नसल्याने मुंबईला रहावे लागले परंतु माजी सभापती संजय बोंढारे, राजेंद्र शिखरे, शेषराव बोंढारे, अभय पाटील सावंत यांच्यासह राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी निवडणुकीचा प्रचार हाती घेत विजय मिळवला आहे. त्यामुळे हा सर्व



हिंगोली- शहरातील अकोला बायपास येथे शिवनेरी चौकात रूद्राक्ष गणेश मंडळाच्यावतीने लालबागच्या राजाची सुंदर गणेश मूर्तीची स्थापना करणयत आली आहे.



हिंगोली- येथील पोस्ट ऑफीस रोडवरील गजराज गजराज बाल गणेश मंडळाच्यावतीने श्री गणेशाची भव्य मूर्तीसमोर सुंदर असा देखावा सादर करण्यात आला आहे.



हिंगोली- शहरातील इंदिरा गांधी चौकात सार्वजनिक शिवसेना मंडळाच्यावतीने सुंदर अशा मंदिराची प्रतिकृती

# घाणेवाडी जलाशय संवर्धन व उध्वस्त सांडव्याबाबत मुख्यमंत्र्यांना भेटणार - खा. डॉ. कल्याण काळे

## नदीपात्रातील अतिक्रमणे, प्रदूषण व विविध मुद्द्यावरील संवाद सत्रात ५० सेवाभावी संस्थांचा सहभाग

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

कित्येक वर्षापासून जालना शहरासाठी वरदान ठरत असलेल्या घाणेवाडी तलाव अर्थात संत गाडगेबाबा तलावाचे संरक्षण आणि संवर्धन होणे अत्यंत महत्त्वपूर्ण असून, उध्वस्त झालेले दोन्ही सांडवे अत्यंत गंभीर बाब आहे. हाताला कधीही फुटण्याची व्यक्त करण्यात येत असलेली भीती विचारात घेता, यात लक्ष घालण्याबाबत आपण नूतन जिल्हाधिकाऱ्यांना पत्र दिले आहे. एवढ्यावरच न थांबता थेट मुख्यमंत्र्यांना भेटून गांभीर्य लक्षात आणून दिले जाणार असल्याचे खा. डॉ. कल्याण काळे यांनी सांगितले. जालना शहरासह जिल्ह्याच्या कायापालट करण्यासाठी आपणा सर्वांना हातात हात घालून वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवर जाऊन काम करावे लागेल, प्रशासकीय कामांसाठी दबाव गट तयार करावा लागेल, अशी साद घालत, यासंदर्भात प्रत्येक महिन्याला बैठक घेऊन विचार मंथन करून पुढील दिशा ठरवली जाणार असल्याचे ते म्हणाले. जालना शहरातील पाणीटंचाई, पर्यावरण, दुरवस्था झालेल्या संत गाडगेबाबा जलाशयाचे संवर्धन, कुंडलिका सीना नदी पुनरूज्जीवन तसेच पर्यावरण संरक्षणार्थ (हरित क्षेत्र विकसित करणे) चर्चा, प्रारूप आराखडा नियोजन व इतर विषयांबाबत खा. काळे यांनी शनिवार दि. ३० ऑगस्ट रोजी आयसीटी कॉलेजच्या सभागृहात ५० सेवाभावी संस्थांसह व्यापारी, उद्योजकांशी संवाद साधला. व्यासपीठावर महिकोचे चेअरमन राजेंद्र बारवाले, कलश सीड्सचे व्यवस्थापकीय संचालक समीर अग्रवाल, घाणेवाडी जलसंरक्षण मंचचे भाईश्री रमेशभाई पटेल, कुंडलिका – सीना पुनरूज्जीवन अभियानचे सुनीलभाई रायठठ्ठा यांची उपस्थिती होती. याप्रसंगी झालेल्या चर्चेत घाणेवाडी जलसंरक्षण मंचचे शिवरतन मुंदडा, कुंडलिका सीना फाउंडेशनचे उदय शिंदे, समस्त महाजन ट्रस्टचे सुरेश कुलकर्णी, जलसंधारण विभागाचे सेवानिवृत्त अभियंता रघुनाथ कल्याणकर, जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष विनीत सहानी, संजयकुमार दाड, उद्योजक अर्जुन गेही, जनविकास परिषदेचे मनोहर सरोदे, रोटरी क्लब ऑफ जालना इलाईटचे अध्यक्ष उमेश बजाज, सृष्टी फाउंडेशनचे संजय देशपांडे, जालना क्रेडाईचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार, सहकार भारतीचे अध्यक्ष सचिन वाणी, सीए अजित छाबडा, पर्यावरण प्रेमी आशिष पाठक, रोटरीच्या डॉ. प्रतिभा श्रीपत, शंभर शिक्षक सोशल क्लबचे राजेभाऊ मगर, अंजनी फाउंडेशनच्या विद्या जाधव, आय सी टी चा विद्यार्थी चैतन्य वराडे आदींनी सहभाग नोंदविला. बोगस पीआर कार्ड, खंडणीखोर आणि भूमाफियांचा बंदोबस्त करणे, नद्यांचा संरक्षणासाठी रेड आणि ब्लू लाईन मार्किंग, जालन्यातून नव्याने वंदे भारत ट्रेन, वाढते प्रदूषण, नाट्य आणि सांस्कृतिक चळवळ सुरू ठेवण्यासाठी मास्टर फुलंब्रीकर नाट्यगृह आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक सभागृहाचे नूतनीकरण आदी उपस्थित झालेल्या चर्चा झाली. जलसंधारणचे सेवानिवृत्त अभियंता श्री. कल्याणकर यांनी घाणेवाडी जलाशय कुठल्याही क्षणी फुटू शकते, अशी भीती व्यक्त करून, या तलावाची उंची सहा मीटरने घटल्याचे तसेच सांडव्याची उंचीही कमी झाल्याचे सांगितले. सांडव्याची दुरावस्था भयावह असून ढगफुटीसदृश्य पाऊस झाल्यास तलाव टिकेल, याची शाश्वती नसल्याचे सांगितले. सर्वांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर खा. काळे म्हणाले की, सामाजिक संस्था म्हणून आपण या आज फक्त घाणेवाडी संवर्धन आणि नद्या संवर्धनावर चर्चा झाली. उध्वस्त झालेल्या सांडव्यांमुळे घाणेवाडी तलाव केव्हाही फुटून मोठ्या हानीची भीती सर्वांनीच व्यक्त केली आहे. त्यामुळे विलंब न लावता तातडीने मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. जनसहभागातूनच परिवर्तन घडवून आणता येईल, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उदय शिंदे यांनी केले. शेवटी खा. काळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



### सांडव्याची दुरुस्ती न झाल्यास मोठा धोका–रमेशभाई पटेल

भाईश्री रमेशभाई पटेल म्हणाले की, पूर्वी महिन्याला एकदा नळ येत होते. म्हणजेच तीव्र पाणीटंचाई होती. त्या अनुषंगाने जालनेकर पाण्यासाठी अवलंबून असलेल्या घाणेवाडी जलाशयातील गाळ उपसा करण्याचे काम सन २०१० पासून सुरू झाले. प्रशासनाकडून एक पोकलेन मिळाला होता. नंतर आम्ही देखील पोकलेन लावले. उद्योजक, व्यापारी जनतेचाही सहभाग वाढला. मागच्या वर्षी ५ लाख ट्रॅक्टर गाळ उपसण्यात आला. आतापर्यंत सुमारे १० लाख ट्रॅक्टर गाळ उपसण्यात आला आहे. यावर्षी तलाव ओसंडून वाहत आहे. मात्र, सांडव्याला गळती लागली आहे. योग्य वेळी दुरुस्ती न झाल्यास मोठे नुकसान होऊ शकते. यासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या सहकार्याची गरज आहे. हे काम एकट्या सामाजिक संस्था करू शकत नाहीत, असे ते म्हणाले.

### मूळ समस्या घाणेवाडी कुणाच्या मालकीची?– सुनीलभाई रायठठ्ठा

याप्रसंगी सुनीलभाई रायठठ्ठा म्हणाले की, ना जलवाहिनी फुटण्याची भीती, ना वीजपुरवठ्याची गरज यामुळे घाणेवाडी जलाशयाकडे जालनेकरांनी कधीच लक्ष दिले नाही. मुख्य समस्या म्हणजे हा तलाव कुणाच्याही मालकीचा नाही. महानगरपालिका फक्त यूजर आहे. कुणाची मालकी नसल्याने अतिक्रमणे वाढली आहेत. महापालिकेकडे दुरुस्तीची तांत्रिक क्षमता नाही. ही बाब विचारात घेता इंजीनियरिंगची क्षमता असलेल्यांकडेच हा तलाव हस्तांतरित होणे गरजेचे आहे. याबाबत आम्ही जलसंधारण विभागाच्या अभियंत्याला भेटलो. ते जबाबदारी घ्यायला तयार आहेत मात्र त्यासाठी हस्तांतर महत्त्वाचे आहे. महाराष्ट्र शासनाने कुंडलिका – सीना नदी संवर्धन प्रकल्प हाती घ्यावा, अशी विनंती करून याबाबतचा डीपीआर आम्ही तयार केलेला आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

### शासन पातळीवर डीपीआरचे काम व्हायला हवे – राजेंद्र बारवाले

जनतेचे सहकार्य, शासकीय यंत्रणा आणि राजाश्रय असेल तर काहीच अशक्य नाही. घाणेवाडी संदर्भात खा. डॉ. कल्याण काळे यांनी पुढाकार घेऊन सर्वांची मते आजच्या परिसंवादात जाणून घेतली, ही सकारात्मक बाब आहे. एका बैठकीवर काहीच होणार नाही, त्यासाठी बैठकांचे निश्चित तारखांचे वेळापत्रक ठरवावे. घाणेवाडीवर दहा वर्षापासून जलसंरक्षण मंचच्या माध्यमातून लोकसभागातून काम सुरू आहे. शासनाचे यासाठी सहकार्य मिळो अथवा न मिळो; पण शासनाने काम अडवले नाही, ही सकारात्मक गोष्ट आहे. घाणेवाडी दुरुस्ती आणि नद्या संवर्धनाचे काम मार्गी लावण्यासाठी डीपीआर तयार होणे आवश्यक असून, खा. काळे यांनी याचे नेतृत्व स्वीकारावे आणि काम तडीस नावे, जालनेकर तुम्हाला काही कमी पडू देणार नाही, अशी साद त्यांनी घातली.

### तालुका पातळीवरही नदीजोड प्रकल्प व्हावेत–शिवरतन मुंदडा

शिवरतन मुंदडा म्हणाले की, घाणेवाडी जलसंरक्षण मंचाशी प्रत्येक नागरिक जुडला गेल्यानंतर नदी संवर्धनाचे काम हाती घेण्यात आले. निसर्ग पूर्वीप्रमाणेच आहे. फक्त पडणाऱ्या पावसाचे पाणी साठविणे आणि जमिनीत जिरविणे गरजेचे आहे. जिल्ह्यात २३६ कोल्हापुरी बंधारे आहेत. खोलीकरणही होत आहे. मात्र, लोखंडी दरवाजे चोरीला जात असल्याने पाणी वाहून जाते. यावर पर्याय म्हणून दरवाजांऐवजी दोन ते अडीच मीटर उंच भिंत उभी केल्यास ही समस्या मार्गी लागू शकते. तालुकास्तरावर देखील नदीजोड प्रकल्प हाती घ्यावा यासाठी, खा. कल्याण काळे यांनी लक्ष घातल्यास ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात पाणी पातळी वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

---

# संक्षिप्त

## जिल्हा हॉलीबॉल स्पर्धेत विवेकानंद इंग्लिश स्कुल च्या तिन संघाची निवड



तभा वृत्तसेवा
परतुर / प्रतिनिधी

क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परीषद जालना आयोजित तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धे मध्ये परतुरच्या विवेकानंद इंग्लिश स्कूल चे यश या स्पर्धेत स्कूल च्या तिन संघाची जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे विवेकानंद इंग्लिश स्कूल अंडर १४ मुले, अंडर १७ मुले, अंडर १७ मुली, या प्रसंगी शाळेचे अध्यक्ष डॉ. बाहेकर शालेय समितीचे अध्यक्ष संदिप बाहेकर विवेकानंद इंग्लिश स्कूल चे प्राध्यापक संतोष चाको, विवेकानंद पब्लिक स्कूलचे प्रिन्सिपॉल विजय दंदाले, तालुका क्रीडा संयोजक प्रमोद राठोड, सरफराज कायमखानी, आकाश गोरे, अनिकेत चिखले, अलका आंभुरे मॅडम, लक्ष्मण शिंदे तसेच सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या.

## मंठा पोलिसांचे अवैध धंदे रोखण्यासाठी धाडसत्र ; पंधरा दिवसात कारवाईचे द्विशतक पूर्ण अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले




तभा वृत्तसेवा
मंठा / प्रतिनिधी

मागील पंधरा दिवसापासून मंठा पोलीस निरीक्षक मनोजकुमार राठोड यांनी निरीक्षक पदाची सूत्र हाती घेतल्यापासून यांच्या पथकाने अवैध धंदे करणाऱ्यां विरोधात विशेष धाडसत्र मोहीम सुरू केली आहे. यात पंधरा दिवसांमध्ये विविध गुन्ह्यांमध्ये २०० च्या वर कार्यवाही करत आरोपींच्या मुस्क्या ओवळत दोन लाख ६४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यासह अल्पवयीन मुलीस फुस लावून पळून नेणाऱ्या आरोपीचा १२ तासात शोध घेत मुलीला सुखरूप पालकांच्या स्वाधीन केल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून प्राप्त झाली आहे. मंठा शहरासह तालुक्यांमध्ये पोलीस निरीक्षक राठोड यांच्या पथकाने अवैध दारू, जुगार, मटका व अवैध वाहतूक तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्यासह विविध गुन्ह्याच्या थेट २०१ कारवाया पंधरा दिवसात केल्या आहेत. यामध्ये अवैध दारू प्रकरणी एक लाख तीस हजार सहाशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करत १७ कारवाया केल्या आहेत. तर अवैध जुगार खेळणाऱ्या वर दहा कार्यवाही करत १४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याचबरोबर अवैद्य वाहतूक सह वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या १७५ वाहनांवर पोलिसांनी कारवाई करत एक लाख २० हजार रुपयांचा दंड केला आहे. यासह विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घरफोडी करणारे अट्टल सराईत दोन गुन्हेगारांना मंठा पोलिसांनी जेरबंद करत त्यांच्याकडून मंठा घरपोडीतील ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंठा तालुका हद्दीतील विविध गुन्ह्यांतील पन्नास आरोपींवर प्रतिबंधक कार्यवाही करत त्यांना स्थानबद्धबाबत नोटीसा देण्यात आल्या असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे विविध धंदे धारकांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत. मंठा पोलीस ठाणे हद्दीतील अवैध रोखण्यासाठी विशेष पथक नेमून मोहीम सुरू केली आहे. पार्श्वभूमीवर नागरिकांनीही आपल्या परिसरात विविध सुरू असल्याची माहिती पोलिसांना द्यावी, सदर माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येईल. त्यामुळे पोलिसांना विविध धंद्याची माहिती निसंकोच पणे द्यावी असे आवाहन पोलीस निरीक्षक मनोजकुमार राठोड यांनी केले आहे.

---

# मराठा आरक्षणासाठी बबनराव लोणीकर यांचा पुढाकार: मुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे कायदेशीर कार्यवाहीची मागणी

तभा वृत्तसेवा
परतूर / प्रतिनीधी

परतूर, दि. ३१ ऑगस्ट २०२५: मराठा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपण दूर करण्यासाठी आरक्षणाची नितांत आवश्यकता असल्याचे सांगत माजी मंत्री व परतूर विधानसभा मतदारसंघाचे आ. बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून मराठा आरक्षणाला जाहीर पाठिंबा दिला आहे. कायद्याच्या चौकटीत टिकणारे आणि सुप्रीम कोर्टाच्या निकषांना अनुरूप असे आरक्षण मराठा समाजाला मिळावे, यासाठी योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याची विनंती त्यांनी पत्राद्वारे केली आहे. आ. बबनराव लोणीकर यांनी पत्रात नमूद केले की, मराठा समाज हा आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला असून, त्यांच्या जीवनमान उंचावण्यासाठी आरक्षण हा महत्त्वाचा मार्ग आहे. सर्वसामान्य, गोर – गरीब,



शेतकरी आणि कष्टकरी मराठा समाजाला न्याय मिळावा, ही माझ्यासह संपूर्ण मराठा समाजाची भावना आहे. यासाठी मी मराठा आरक्षणाला पूर्ण पाठिंबा देत आहे, असे त्यांनी पत्रात म्हटले आहे. तसेच, फडणवीस सरकार नेहमीच मराठा आरक्षणाच्या बाजूने सकारात्मक भूमिका घेत असल्याचा विश्वास व्यक्त करत, लवकरात लवकर कायदेशीर तोडगा काढण्याची मागणी त्यांनी केली आहे. यापूर्वी २०१८ मध्ये फडणवीस सरकारने मराठा समाजाला १६% आरक्षण देणारा कायदा मंजूर केला होता, जो मुंबई उच्च न्यायालयाने वैध ठरवला होता. परंतु, सुप्रीम कोर्टाने २०२१ मध्ये हा कायदा रद्द केला. सध्या मराठा आरक्षणाबाबत क्युरेटिव्ह याचिका सुप्रीम कोर्टात प्रलंबित असून, ११ सप्टेंबर २०२४ रोजी यावर सुनावणी होण्याची शक्यता आहे. तसेच, २० फेब्रुवारी २०२४ रोजी राज्य सरकारने १०% आरक्षण देणारा नवीन कायदा मंजूर केला आहे, जो सध्या मुंबई उच्च न्यायालयात आव्हानित आहे. यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाच्या अहवालाचा आधार घेण्यात आला आहे. आ. बबनराव लोणीकर यांनी मराठा समाजाच्या हितासाठी सरकारच्या प्रयत्नांना पाठिंबा देत, या विषयावर सातत्याने कायदेशीर लढाई लढण्याची गरज असल्याचे अधोरेखित केले. मराठा समाजाला योग्य तो न्याय मिळवून देण्यासाठी सरकार सर्व कायदेशीर पर्यायांचा वापर करेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

---

# भटक्या विमुक्त दिनानिमित्त वडीगोद्री येथे अंबड महसूल प्रशासनाकडून प्रमाणपत्र वाटप

तभा वृत्तसेवा
अंबड /प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील वडीगोद्री धाकलगाव येथे आज अंबड तहसीलदार विजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली भटक्या विमुक्त जाती जमातीतील विद्यार्थ्यांना तग– जातीचे प्रमाणपत्र वडीगोद्री चे उपसरपंच अण्णासाहेब पा. काळे व अंबड तालुकाप्रमुख बाळासाहेब गावडे यांच्या हस्ते देण्यात आले यावेळी वडीगोद्री मंडळाचे मंडळ अधिकारी संदीप नरोटे यांनी भटक्या विमुक्त जाती जमातीसाठी शासकीय दरबारी काय



काय योजना आहेत त्याची रीतसर माहिती दिली व त्याचा लाभ शासन दरबारी कसा घ्यायचा याची सविस्तर माहिती नरोटे यांनी दिली सदरील लाभार्थी पुढील प्रमाणे आहे.राहुल शंकर खवले, अजय अंकुश राठोड, दीपक शंकर खवले या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले यावेळी उपस्थित वडीगोद्री ग्रामपंचायत सदस्य रोहिदास पवार, रायचंद तात्या गावडे, वसंत गायसमुद्रे, पवन पवार, पत्रकार लोकमत सतीश डोळे, शिवाजी गावडे, मस्के भारती यावेळी वडीगोद्री गावातील भटक्या विमुक्त जाती जमातीचे समाज बांधव उपस्थित होते.

---

# मध्यप्रदेश येथुन येऊन समृध्दी महामार्गावर डिझेल चोरी करणारे तीन आरोपी केले जेरबंद स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात होत असलेले डिझेल चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना समृध्दी महामार्गावरील व ईतरत्र ठिकाणी होणाऱ्या डिझेल चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना देवुन मार्गदर्शन केले होते. त्याअनुषंगाने डिझेल चोरी करणाऱ्या आरोपीतांचा शोध घेत असतांना श्री हॉटेल, लक्ष्मीकांत नगर समोर, अंबड रोड, जालना येथे डिझेल चोरी करणारे तीन संशयित इसम थांबलेले असल्याची गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाल्याने त्याठिकाणी जावुन इसम नामे १) समीर नुर मोहम्मद मेव, वय–२८ वर्ष, रा.दोपाडा, जि. शाजापुर, राज्य मध्यप्रदेश २) हनिफ खान मुंशी खान, वय–३२ वर्ष, रा. दोपाडा, जि. शाजापुर, राज्य मध्यप्रदेश ३) हुसैन खान अजिज खान, वय–२७ वर्ष, रा. सुजानपुर, जि. शाजापुर, राज्य मध्यप्रदेश यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी व जालन्यातील दोन साथीदारांनी मिळुन दिनांक ३०/०७/२०२५ रोजी सकाळी ०४:३० वाजेच्या सुमारास समृध्दी महामार्गावरील गुंडेवाडी पेट्रोलपंपाजवळ ट्रक चालकास तलवारीचा धाक दाखवुन ट्रकमधुन १०० लिटर डिझेल चोरी केल्याचे सांगितले. त्याअनुषंगाने चंदनझिरा पोलीस ठाणे येथे दाखल गु.र.नं.३७९/२०२५ कलम ३०९(६), ११५(२), ३(५) भा.न्या.सं. सह कलम ४,२५ भा.ह.का. दाखल असुन त्यामधील मुददेमाल यापुर्वीच जप्त करण्यात आलेला आहे. तसेच दिनांक १५/०८/२०२५ रोजी सकाळी ०१:०० वाजेच्या सुमारास समृध्दी महामार्गावर एका कंटेनर ट्रकमधुन ७० लिटर डिझेल चोरी केल्याची कबुली दिली. त्याअनुषंगाने व पोस्टे चंदनझिरा, जालना गु.र.नं.४०६/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हा करतांना आरोपीतांनी वापरलेले रु.३१,०००/– किंमतीचे तीन मोबाईल जप्त करण्यात आले आहे. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल व अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, सपोनि. सचिन खामगळ, पोउपनि राजेंद्र वाघ व सोबत स्थागुशाचे अमंलदार भाऊराव गायके, प्रभाकर वाघ, रमेश राठोड, सागर बाविस्कर, इरशाद पटेल, अशोक जाधवर यांनी केली आहे.

---

# भाजपा जालना महानगरात मन की बात कार्यक्रमाला कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग पंतप्रधान मोदींजींच्या प्रेरणादायी विचारांनी कार्यकर्त्यांना नवचेतना - जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे

तभा वृत्तसेवा
जालना /प्रतिनिधी

भारताचे लोकप्रिय पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी यांनी आज (ता.३१) सकाळी ११ वाजता मन की बात या मासिक रेडिओ कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासीयांशी संवाद साधला. हा मुख्य कार्यक्रम भाजप जिल्हा कार्यालय, जालना येथे संपन्न झाला. कार्यक्रमासाठी भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे हे स्वतः उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदीजींचे मार्गदर्शन हे प्रत्येक कार्यकर्त्यासाठी प्रेरणादायी असून, 'मन की बात' कार्यक्रमाद्वारे देशहिताचे विचार, सामाजिक जाणीवा आणि नवचेतना निर्माण होते. असे त्यांनी सांगितले. यावेळी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, सतीश जाधव, सोपन पेंढारकर, धनराज काबलिये, शशिकांत घुगे, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, भागवत बावणे, कपिल दहेकर, सिद्धिविनायक मुळे, विष्णू डोंगरे, देविदास देशमुख, अनिल सरकटे, कैलास उबाळे, सुभाष सले, मनोज बिडकर, जगदीश येनगुपटला, संतोष खंडेलवाल, विकास कदम, गौरव गोधेकर, निलेश गवळी, प्रशांत आढावे, शाम उगले, शाम उगले, राम शेजुळ, शिवाजी गायकवाड आदींसह अनेकांची उपस्थिती होती. तसेच सदरील कार्यक्रम भाजपा जालना महानगरातील विविध मंडळात आयोजित करण्यात आला त्यामध्ये नवीन जालना मंडळात मंडळ अध्यक्ष सुनील खरे यांच्या



मार्गदर्शनाखाली, जुना जालना मंडळात मंडळ अध्यक्ष महेश निकम, पूर्व जालना मंडळात अमोल धानुरे व जालना ग्रामीण मंडळात तालुकाध्यक्ष संजय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. या कार्यक्रमाला महिला मोर्चा, युवा मोर्चा, व्यापारी आघाडी, अनुसूचित जाती–जमाती मोर्चा, अल्पसंख्याक मोर्चा, इत्यादी आघाड्यांचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मन की बात कार्यक्रम ऐकला.

# सातवीच्या विद्यार्थ्यासोबत अनैसर्गिक कृत्य

## माहूर तालुक्यातील एका नामांकित शाळेतील घटना

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि. ३१ ऑगस्ट -**

तालुक्यात मानवतेला काळीमा फासणारी घटना उघडकीस आली असून तालुक्यातील एका नामांकित शाळेत सातवीच्या वर्गात शिकणाऱ्या एका १२ वर्षीय विद्यार्थ्यासोबत अनैसर्गिक कृत्य केल्याची खळबळजनक घटना घडल्याप्रकरणी माहूर पोलीस ठाण्यात ४ विधिसंघर्षितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माहूर तालुक्याच्या दुर्गम भागातील एका गावातून तालुक्यातील एका खाजगी शिक्षणसंस्थेच्या विद्यालयाशी संलग्न असलेल्या वस्तीगृहात राहून त्याच विद्यालयात इयत्ता सातवीत शिक्षण घेत असलेल्या १२ वर्षीय पिडीत विद्यार्थ्याच्या पित्याने माहूर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांचा पिडीत मुलगा इयत्ता पाचवीपासून याच ठिकाणी राहून शिक्षण घेत आहे.. दरम्यान दि. १९ जुलै २०२५ रोजी दुपारी १वाजताच्या सुमारास इयत्ता नवव्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या ४ विधीसंघर्षीत बालकांनी संगनमत करून पिडीत विद्यार्थ्याचे कपडे काढले व अनैसर्गीक कृत्य केले.त्यावेळी एकजण पिडीतासोबत अनैसर्गीक कृत्य करीत असताना बाकीच्या तिघांनी त्याला मदत केली. शिवाय घटनेचा व्हिडीओ देखील काढला ज्याला अतिशय घृणास्पद असा प्रकार म्हणावा लागेल.

विशेष म्हणजे मानवतेला काळीमा फासणाऱ्या या अतिशय घृणास्पद घटनेचा व्हिडीओ पिडीत मुलाच्या थेट गावापर्यंत वायरल झाल्याने या घटनेची माहीती पिडीत बालकाच्या वडीलांना कळाली.त्यानंतर त्यांनी ते व्हिडीओ घेवून थेट माहूर पोलीस ठाणे गाठले.

दरम्यान काल दि. ३० ऑगस्ट रोजी माहूर पोलीस ठाण्यात गु.र.नं. १५२/२०२५ कलम ३,४, ५, च्, ६, ८, १२ पोक्सो. तसेच सहकलम ३५१ (१), ३५१ (२) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून,घटनेतील ४ विधीसंघर्षीत बालकांपैकी दोघांना माहूर पोलीसांनी ताब्यात घेवून नियमाप्रमाणे कार्यवाही सुरू असल्याचे माहूर पोलीसांनी सांगितले आहे. प्रकरणाचा तपास माहूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. शरद घोडके हे करीत आहेत.

# खा. अशोक चव्हाण यांनी केली पुरग्रस्त भागाची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. ३१ ऑगस्ट -**

मुदखेड तालुक्यात गेल्या दोन दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेकांच्या घरात पाणी शिरले व शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर खा. अशोक चव्हाण यांनी शहरातील सीतानदी वरील बंधाऱ्याची पाहणी करत तालुक्यातील पुरग्रस्त गाव राजवाडी येथील पाण्यात गेलेली घरे व शेतीची पाहणी केली व गावकऱ्यांशी चर्चा करून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. तसेच पिंपळकोठा (मगरे) परिसरात पुलाची आणि शेतीची पाहणी करित खा. अशोक चव्हाण यांनी शहरातील नंदीनगर परिसरातील नागरिकांच्या समस्या जाणुन घेतल्या यानंतर धनगर टेकडी येथील जमीनदोस्त झालेल्या पुरातन जागृत खंडोबा देवस्थान मंदीराची पाहणी केली.



या भेटीदरम्यान, खा. अशोक चव्हाण यांनी स्थानिक रहिवाशांशी संवाद साधला. त्यांना त्यांचे जीवन पुन्हा उभारण्यास मदत करण्यासाठी मदत आणि मदत करण्याचे आश्वासन दिले. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांची देखील पाहणी केली आणि संबधित अधिकाऱ्यांना त्वरित कारवाई करण्याचे निर्देश दिले.

यावेळी तहसीलदार आनंद देऊळगांवकर, गोविंद शिंदे नागेलीकर, भाजपा शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण, प्रविण गायकवाड, माजी नगसेवक संजय आऊलवार, बाळासाहेब देशमुख बारडकर, राजवाडीचे सरपंच प्रतिनिधी आनंदा गुंजकर, पोलीस पाटील नितिन जोंधळे, शेतकरी गोविंद जोंधळे, पिंपळकोठा मगरे सरपंच देविदास जोंधळे, कालिदास जंगिलवाड, देवा धबडगे, कुणाल चौदंते, गजू कमळे, कानोबा बिस्मीले आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### देवाभाऊ फाउंडेशनच्या नांदेड लोकसभा सह-समन्वयक पदी तालीमकर यांची नियुक्ती

**नवीन नांदेड**-देवाभाऊ फाउंडेशन महाराष्ट्र राज्य या भाजपाच्या संघटनेत रमेश तालीमकर यांची नांदेड लोकसभा सह समन्वयक म्हणून या पदावर निवड संस्थापक मुख्य समन्वयक गजानन जोशी यांच्या सहीनिशी एका नियुक्तीपत्राद्वारे नियुक्ती करण्यात आली आहे. त्याबद्दल रमेश तालीमकर यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. सिडको हडको परिसरातील रहिवासी सामाजिक कार्यकर्ते रमेश तालीमकर हे जीथे काम करत असतात तिथे ते एकनिष्ठेने काम करत असतात त्यांच्या या कठोर एकनिष्ठतेच्या कार्याची दखल घेऊन देवा भाऊ फाउंडेशनने रमेश तालीम कर यांची नांदेड लोकसभा सह समन्वयक संघटनात्मक नियुक्ती दिनांक ३० ऑगस्ट २०२५ रोजी एका नियुक्तीपत्राद्वारे नियुक्ती करण्यात आली आहे. सदरील नियुक्ती पत्रावर संस्थापक मुख्य समन्वयक गजानन जोशी व प्रदेश सह -समन्वयक संघठन डॉ. आशुतोष घोलप यांच्या स्वाक्षरीनिशी नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. या निवडीबद्दल यांचे राजकीय, सामाजिक व मित्रमंडळ साहेबराव शेलुकर उपसरपंच, गणेश काकडे,ग्रामविकास अधिकारी भदरगे,विंशबर शिंदे मंडळ अध्यक्ष,सदस्य हांणमत मेलगे, नवनाथ डाकोरे , प्रदीप लाखे,शेलेद्र ठाकुर महानगर जिल्हा उपाध्यक्ष, शिवाजी मंगर,कीशन धुमाळ, अहमद शेख , दत्ता दुधबे माधव झुंजारे सोशल मीडिया दक्षिण भाजपा मित्रमंडळातून अभिनंदन होत आहे.



### पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मोगलाजी शिरशेटवार यांनी घेतली धाव


**देगलूर**- मागील दोन ते तीन दिवसापासून होत असलेल्या सतत धार अतिवृष्टीमुळे देगलूर तालुक्यातील शेतीची व खरीप पिकांची खूप मोठ्या प्रमाणात नुकसानी झाले आहे. निजामसागर व लेंडी प्रकल्पातील पाण्याच्या विसर्गामुळे देगलूर तालुक्यातील अनेक गावांना पुराचा वेढा घातला आहे. सदरील परिस्थिती च्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार, काँग्रेसचे जिल्हा प्रवक्ते कैलास येसगे कावळगावकर, शेख मीरामोद्दीन, कैलास मुद्मवार एकनाथ टेकाळे. डॉ. मिलिंद शिकारे, ॲड. कापसे यांनी तमलूर, मेदनकल्लूर, शेकापूर, शेळगाव या गावांना भेटी देऊन तेथील पूरग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधला व पिकाची, घराची झालेल्या नुकसानीची पाहणी करीत होते . त्यादरम्यान ज्या लोकांना जाण्यासाठी वाहने नाहीत आशा लोकांसाठी शिरशेटवार यांनी वाहने बोलावून घेऊन त्याच्या पुनर्वसनाची व्यवस्था केली व सिद्धेश्वर मंगल कार्यालय येथे स्वतः जाऊन तेथील नागरिकांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था करून दिली.यावेळी पूरग्रस्त नागरिकांना बोलताना काँग्रेस पक्षाचे जिल्हा प्रवक्ते कैलास येसगे कावळगावकर यांनी झालेल्या नुकसानीची सरकारने तात्काळ दखल घेऊन देगलूरसह संपूर्ण नांदेड जिल्हा ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरीव अशी आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली.



# महापुरुषांच्या जयंत्या नाचून नाहीतर वाचून साजऱ्या कराव्यात : वैशालीताई कांबळे

**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड, दि. ३१ ऑगस्ट -**

सोनखेड येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी पोलीस उपनिरीक्षक वैशालीताई कांबळे यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले यावेळी उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करताना त्या असे म्हणाल्या की आमच्या पोलीस स्टेशन तर्फे असा मानस राहील की प्रत्येक गावात वाचनालय हे ग्रामपंचायत च्या माध्यमातून चालु करावे जेणेकरून गावातील तरुण पिढी ही पुस्तकाच्या माध्यमातून एकरूप होऊन त्या मधून सुजाण नागरिक निर्माण होण्यास मदत होईल व महापुरुष्याच्या जयंती हया नाचून नाही तर वाचुन साजऱ्या कराव्यात. या वेळी सरपंच संगीता इंगळे, उपसरपंच सुनील मोरे व गावातील प्रतिष्ठित नागरिक डॉ पंजाबराव देशमुख, पांडुरंग मोरे, शिवसेना तालुका प्रमुख अशोक मोरे, व सोपान मोरे सुदाम मोरे विलास मोरे व अनेक मान्यवर उपस्थित होते



# बिलोली येथे नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या ओळखपत्रांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ३१ ऑगस्ट -**

जिल्हा मराठी पत्रकार संघाने जिल्ह्यातील संघटनेच्या सदस्यांना ओळखपत्र देण्याचा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. त्याच श्रृंखलेअंतर्गत नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने आज दिनांक ३१ ऑगस्ट रोजी बिलोली येथे ओळखपत्र वाटप सोहळा पार पडला.

बिलोली येथे शासकीय शासकीय विश्रामगृहात झालेल्या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा मराठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष अनिल कसबे, सरचिटणीस अनुराग पोवळे, जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र कांबळे व तालुकाध्यक्ष दादाराव इंगळे यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष संतोष पांडागळे यांनी पत्रकार संघाच्या सदस्यांसाठी ओळखपत्रांसह अन्य सुविधा देण्यासाठी आपण कटीबद्ध आहोत. संघटना मजबूत झाल्यानंतर समस्या सुट शकतात. त्यामुळे पत्रकारांनी एकजूट कायम ठेवावी, असे सांगितले. यावेळी कार्याध्यक्ष अनिल कसबे, सरचिटणीस अनुराग पोवळे, ज्येष्ठ पत्रकार अशोक दगडे, रत्नाकर जाधव, दादाराव इंगळे यांचेही समायोजित भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र कांबळे यांनी केले. या ओळखपत्र वितरण सोहळ्यास बिलोली तालुक्यातील पत्रकारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### महाराष्ट्र राजपत्रित अधिकारी महासंघाची सर्वसाधारण सभा

**नांदेड** -महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाची २०२२-२०२५ या कालावधीतील त्रैवार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच शेगाव, जि. बुलढाणा येथे मोठ्या उत्साहात पार पडली. दोन दिवस चाललेल्या या बैठकीत, वर्ष २०२५ ते २०२८ या कालावधीसाठी नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

# महावितरणच्या ढिसाळ कारभाराविरोधात आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. ३१ ऑगस्ट -**

सणासुदीच्या पार्श्वभूमीवर किनवट शहर व तालुक्यात नागरिकांचा आनंद गगनात मावेना अशी स्थिती असताना, महावितरणच्या निष्काळजीपणामुळे रात्र बेरात्री वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. परिणामी नागरीकांचा जीव अक्षरशः हैराण झाला आहे.

दरम्यान, अतिवृष्टीमुळे वातावरणात मोठा बदल झाल्याने संसर्गजन्य आजार व वायरल फ्लूने रुग्णांची संख्या वाढत आहे. अशातच खंडित वीजपुरवठ्यामुळे शहरात व तालुक्यात प्रचंड डासांचा प्रादुर्भाव झाल्याने नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे.



या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे निकटवर्तीय सुगत नगराळे यांनी महावितरणला जाब विचारत इशारा दिला आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, सणासुदीच्या काळात वीजपुरवठा खंडित होणे ही महावितरणची ढिसाळ कारभारशैली असून, नागरिकांच्या आरोग्याशी व सुरक्षिततेशी खेळ करणाऱ्या अधिकाऱ्यांना आम्ही सोडणार नाही. तातडीने वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास आंदोलनात्मक भूमिका घ्यावी लागेल. असा इशारा नगराळे यांनी दिला आहे.

# अतिवृष्टीग्रस्त कुटुंबांना अर्थिक मदत मिळावी : माजी नगराध्यक्ष सुर्यवंशी

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, दि. ३१ ऑगस्ट -**

शहरात संतधर मुसळधार पावसाचा वेग वाढुन मध्यरात्री अचानक पाण्याच्या सखल भाग व उतरत्या भागात पाण्याच्या प्रवाहात वाढ झाली यामध्ये अनेक कुटुंबाचे नुकसान झाले. यामध्ये अनेक घरांत पाणी शिरले ,व्यापारी दुकान ,किरकोळ दुकानदार,मेकानिकच्या टिन शेडचे अतोनात नुकसान झाले या अतिवृष्टीग्रस्त कुटुंबांना शासनाच्या वतीने आर्थिक मदत द्यावी अशी मागणी लोहा न.प. चे माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष तथा भाजपाचे लोहा शहर मंडळ अध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्याकडे केली.

लोहा शहरातील शेतीतील पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले , तसेच अनेक नागरिकांच्या घरात पुराचे पाणी शिरून घरातील संसारपयोगी वस्तु, अन्न, धान्य आदीचे नुकासान आणि दुकानामध्ये पाणी शिरल्यामुळे व्यावसायीकांचे मोठे नुकसान झाले. तसेच पुर परिस्थीती निर्माण झाल्यामुळे घरासमोरील दुचाकी, चारचाकी वाहने वाहुन गेल्यामुळे झालेले नुकसान व जनावरे दगावली आहे. तसेच पुराच्या पाण्यामुळे शहरातील रस्त्यावर खड्डे पडले आहेत, लोहा शहरातील स्मशानभुमीची संरक्षण भिंत पुरामुळे वाहुन गेली व आतील पेवरब्लॉक सुध्दा वाहुन



गेलेले आहेत. स्मशानभुमी शेजारील शेडमधिल व्यावसायीकांचे दुकानातील साहित्य, मेकॅनिक यांच्याकडे दुरुस्तीसाठी आलेल्या गाड्यासुध्दा दुकानासोबत वाहुन गेल्या आहेत.

शेतकऱ्यांना, व्यापाऱ्यांना, गोरगरीब नागरिकांना तात्काळ आर्थिक मदत करावी अशी मागणी लोकनियुक्त नगराध्यक्ष तथा भाजपाचे लोहा शहर मंडळ अध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांनी नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.यावेळी माजी नगरसेवक युवराज वाघमारे, वैभव हाके, सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण फुलवरे ,बाळासाहेब कतुरे आदी उपस्थित होते.

# आ. कोहळीकर यांची मुख्यमंत्र्यांकडे सरसकट नुकसान गृहीत धरून मदत देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. ३१ ऑगस्ट -**

हदगाव - हिमायतनगर तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी व महापुरामुळे शेतकरी बांधवांचे जमिनीसह पिकांचे १०० टक्के नुकसान झाले असून त्यांचे त्वरित पंचनामे करून तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी आ. कोहळीकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री, कृषीमंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री, आपत्ती व्यवस्थापन मंत्री तसेच महसूल मंत्री यांना निवेदनाद्वारे केली असून मुख्यमंत्री महोदय यांनी तात्काळ महसूल विभागास कार्यवाही करण्याचे आदेश दिल्याचे कळविण्यात आले.



हदगाव तालुक्यात १५८ मि.मी.तर हिमायतनगर तालुक्यात २३२ मि.मी. इतक्या मोठ्या प्रमाणावर पावसाची नोंद झाली असून त्यातच भर म्हणजे ईसापुर धरणातून १३ दरवाज्यातून पैनगंगा नदीच्या पात्रात विसर्ग करण्यात आल्यामुळे नदीकाठच्या गावांमध्ये व ओढे - नाल्याच्या शेतजमिनीचे व उभे पिकांचे पूर्णपणे नुकसान झाले आहेत. काही नागरिकांच्या घरे कोसळली, काही जनावरे वाहून गेली तर प्रत्येक महसूल मंडळात ६५ मि.मी. पेक्षा जास्त पावसाची नोंद झाल्याने विशेषता ऊस, सोयाबीन, कापूस, तूर व भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी वर्ग गंभीर आर्थिक संकटास सामोर जात असून शासनाने १००% नुकसान गृहीत धरून तात्काळ मदत देण्याच्या मागणीवर आ.कोहळीकर ठाम व ठोस भूमिका घेतल्यामुळे त्यास मुख्यमंत्री महोदय यांनी सकारात्मक प्रतिसाद देत महसूल विभागास कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

# चैतन्यनगर शिवमंदिर सभामंडपाचे आज आ. बालाजी कल्याणकर यांच्या हस्ते भुमिपुजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ३१ ऑगस्ट -**

येथील चैतन्यनगर शिवमंदिर परिसरात उभारण्यात येत असलेल्या भव्य सभामंडपाचा भुमिपुजन सोहळा आज सोमवार दि.०१ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता होणार आहे.

नांदेड उत्तर चे आमदार श्री बालाजी कल्याणकर यांच्या हस्ते सभामंडपाचा भुमिपुजन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. चैतन्यनगर शिवमंदिर नांदेड शहर आणि पंचक्रशीत तसेच जिल्ह्यात सर्वदूर प्रसिद्ध असून श्रावण मासात मोठी गर्दी असते. दर सोमवारी शिव भक्तांनी मंदिर परिसर फुलून जातो. अत्यंत सुंदर आकर्षक असे मंदिर उभारण्यात आले आहे. येथील शंभो महादेवाची पिंड सर्वाच लक्ष वेधून घेते अशी आहे. भक्तांची गर्दी आणि त्यांची दर्शन व्यवस्था याचा विचार करून शिवमंदिर विश्वस्त मंडळाने मंदिर परीसरात भव्य असा सभामंडप होणार असून आज १ ऑक्टोबर रोजी आ. कल्याणकर यांच्या हस्ते सभामंडपाच भुमिपुजन करण्यात येणार आहे. सर्व शिवभक्तांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन शिवमंदिर विश्वस्त मंडळाने केले आहे.

# वन जमिन हस्तांतरणाला परवानगी मिळाल्याने २२ कोटी रुपयांच्या विकास कामांना वेग

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. ३१ ऑगस्ट -**

माहूर व किनवट तालुक्यातील दीर्घकाळ प्रलंबित व नागरीक करिता व प्रशासनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असलेली सुमारे २२ कोटी रुपयांची विकासकामे अखेर मार्गी लागली आहेत. वन विभागाच्या बाधीत जमिनीच्या विषयासह परवानगी व आवश्यक जमीन उपलब्ध न झाल्याने अनेक कामे रखडली होती. मात्र आमदार भिमराव केराम यांच्या शासनाकडील सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शासनाने या संदर्भातील अडथळे दूर करून सदर विकासकामांना हिरवा कंदील दाखविला आहे.



या मध्ये माहुर येथे महसुल अधिकारी वर्ग २ चे १२, वर्ग ३ चे ३ तथा वर्ग ४ चे १ अशा शासकीय अधिका-यांच्या निवासस्थानांसाठी वन विभागाची १.५० हे. आर. वन जमिन तसेच किनवट तालुक्यातील पोतरेड्डी रामपुर मार्गावर रस्ता सुधारणा व पूल बांधकाम (किमी ०/०० ते ३/०० व ३/०० ते ६/५००) करिता १.८० हे. आर. वन जमिन या सोबत उमरी तालुक्यातील धावरी ते कृष्णुर मार्गासाठी ८.७६ हे. आर अशी एकुण १२.०६ हे. आर वन जमिनी बाधीत होत असल्याने सदर तिन ही विकास कामे प्रलंबित होते. तरी किनवट माहुर विधानसभा क्षेत्रातील एकुण ३.६० हे. आर वन जमिन महसुल विभागाला वन विभागाकडून मिळवुन देण्यासाठी आ. भिमराव केराम यांनी सातत्यापुर्ण प्रयत्न करुन यश मिळवले व जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी मौजे जिरोना (ता. उमरी, जि. नांदेड) येथील गट क्र.५१ मधील जमीन वनविभागास हस्तांतरित करण्याचा निर्णय जिल्हाधिकारी यांनी घेतला आहे. त्यामुळे विकासकामांना कायदेशीर व प्रशासकीय मार्ग मोकळा झाला आहे. सदर प्रकल्पांमुळे १२.०६ हेक्टर वनजमीन बाधित होत असल्याने पर्यायी जमीन उपलब्ध करणे आवश्यक होते. यासाठी गावपातळीवरील आक्षेप, चारा अभावाची भीती याबाबतही शासनाने स्पष्टता देत ग्रामपंचायत आणि पशुसंवर्धन विभागाच्या अहवालांच्या आधारे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून चारा लागवड करावी, अशी अट घालून समाधानकारक तोडगा काढण्यात आला आहे. यामुळे माहूर व किनवट तालुक्यातील रस्ते विकास, पूल बांधणी, महसूल अधिकारी निवासस्थान यांसारख्या महत्त्वाच्या कामांना गती मिळणार असून कोट्यवधी रुपयांच्या निधीची कामे प्रत्यक्षात सुरू होणार आहेत. आमदार भिमराव केराम यांनी याबाबत समाधान व्यक्त करताना सांगितले की, जनतेसाठी महत्त्वाची कामे रखडलेली पाहवत नव्हती. त्यासाठी पाठपुरावा करून शासन दरबारी समस्या मांडली. आता कामांना मंजुरी मिळाल्याने तालुक्यातील जनतेचा विकासाचा मार्ग खऱ्या अर्थाने मोकळा झाला आहे.

# मेट येथील अवैध हातभट्टीची दारू विक्री बंद करा

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि. ३१ ऑगस्ट -**

तालुक्यातील मेट येथे एकवटलेल्या महिलांनी गावात दारूबंदीसाठी कंबर कसली असून, गावात काही लोक अवैधरीत्या मोहफुलाची व इतर वस्तूच्या हातभट्टी लावून त्यातून तयार केलेली गाळलेली दारू खुलेआम विक्री करीत आहेत. तसेच दारूची मागणी वाढून जास्त विक्री होण्याकरिता जाणीवपूर्वक नवीन किशोरवयीन व नवयुवकांना दारूचे व्यसन लावण्याचे भयंकर गंभीर काम राजरोसपणे करीत असल्याने सदरील हातभट्टीची दारू विकणाऱ्या, वाढवणाऱ्यां विरुद्ध तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी मेट येथील महिलांनी माहूर पोलीस ठाण्यात प्रत्यक्ष येऊन निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनावर सौ. यशोदा येरमे, सरपंच जयश्री मुनेश्वर, कौशल सिडाम, मोहिनी जाधव,. अर्चना आडे, रामिबाई सिडाम, पार्वती कुक्रेपंधेरे, रीना मुनेश्वर, मंगला सिडाम, चंद्रकला सिडाम, ज्योत्स्ना जाधव, ललिता जाधव, अंजली मुनेश्वर, वंदना प्रेमसिंग राठोड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.


**टी. सी. हरवली**

माझी कृष्णा दत्तराव सूर्यवंशी नावाची १० वी पासची टि. सी. हरवली बाळापूर ते हदगांव प्रवासा दरम्यान हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा

**-संपर्क-**
**कृष्णा दत्ताराव सूर्यवंशी**
**मो. ८१४९४८३४३३**


# पालकमंत्र्यांचा आटोपता दौरा ; शेतकऱ्यांचा उसळला संताप!

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि. ३१ ऑगस्ट -**

तालुक्यात दोन-तीन दिवसांपूर्वी झालेल्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले असून, शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. नांदेड जिल्ह्यातील नरसी, कुंचेली, होटाळा, गौरी-शेळगाव आदी गावांमध्ये पाणी साचल्याने शेती पाण्याखाली गेली आहे, अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. काही काळ हैद्राबादला जोडणारा महामार्गही पूर्णतः ठप्प झाला होता. दरम्यान ३० ऑगस्ट रोजी पालकमंत्री अतुल सावे यांनी पूरग्रस्त गावांचा दौरा जाहीर केला होता. परंतु त्यांनी प्रत्यक्ष शेती व घरांची पाहणी न करता केवळ रस्त्यावरून शासनाकडून सर्वतोपरी मदत केली जाईल असे सांगून ताफा परत वळविला. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली.या निष्काळजी पणा विरोधात कुंचेली येथील शेतकऱ्यांनी संतप्त होऊन कुंचेलीतील चिखलमय भागातच रस्ता रोको आंदोलन केले. दोन तासा नंतरच उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांनी महसूल च्या यंत्रणेला सरसकट तात्काळ पंचनामे करण्याचे आश्वासन दिल्याने



आंदोलन मागे घेण्यात आले.

या संकट काळात रामतीर्थचे सपोनि विक्रम हराळे, नरसी बिटचे जमादार चंद्रमणी सोनकांबळे व पोलीस कॉन्स्टेबल गणपत राठोड यांनी मुसळधार पावसात वाहतूक व्यवस्थापनाचा भार उचलत वाहनधारकांना योग्य मार्गदर्शन करत सुरक्षित स्थळी थांबवले. त्यांच्या तात्काळ कृतीमुळे मोठा अपघात टळला. या आपत्तीच्या काळात नायगाव मतदारसंघाचे आमदार राजेश पवार हे मात्र लोकमत पुरस्कार समारंभात सहभागी झाले होते. दुसरीकडे, जवानांनी जीवाची पर्वा न करता कुंचेली परिसरातील पूरग्रस्तांना सुरक्षित स्थळी हलवले. उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे व तहसीलदार सौ. धम्मप्रिया गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली महसूल विभागाने परिस्थिती आटोक्यात आणण्या साठी तत्परता दाखवली. स्थानिक पत्रकार व समाज सेवकांनी ही मदतीसाठी पुढाकार घेतला.मात्र, पालकमंत्री अतुल सावे यांचा दौरा फक्त औपचारिक ठरल्याची शेतकऱ्यांची भावना आहे. शेतकऱ्यांनी पालकमंत्र्यांच्या दौऱ्याला 'फॉर्मेलिटी' संबोधत संताप व्यक्त केला आहे. प्रत्यक्ष पाहणी न करता भाषणं आणि आश्वासनं देणाऱ्या लोकप्रतिनिधींवर नाराजी वाढत आहे. तात्काळ पंचनामे करून योग्य नुकसानभरपाई द्यावी व पुढील धोरणे प्रत्यक्ष अनुभव आणि परिस्थिती लक्षात घेऊन ठरवावीत, ही पूरग्रस्तांची एकमुखी मागणी आहे.

**कुष्णूर येथील वृद्ध महिलेचा मृत्यू**

या पावसामुळे कुष्णूर येथील लक्ष्मीबाई नागोराव पचलिग वय ८० या वृद्ध महिला पुरात वाहून गेल्या होत्या. त्यांचा मृतदेह ३१ ऑगस्ट दुपारी नांदेड-हैद्राबाद महामार्गावरील पुलाजवळील शेजारी सापडला. मृतदेहांची जागेवरच वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, जावई व नातवंड असा परिवार असून गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.